
# हाकारा

वर्ष : चोविसावे ◆ अंक : तिसरा

जुलै - सप्टेंबर २००३



# ■ महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ■

## ◆ कार्यकारी मंडळ ◆

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. विजय भानू |
| सचिव | : | डॉ. एस. आर. वाळिंबे |
| सह सचिव | : | अभय कुदळे |
| खजिनदार | : | पुरूषोत्तम आगाशे |
| सभासद | : | वाहरू सोनावणे |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | जयवंत मंत्री |
| | : | ग. शां. पंडित |
| | : | डॉ. कल्पना मुटाटकर |
| | : | डॉ. सुधाकर मोराणकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता वंदन करतो पददलिता !
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

वर्ष चोविसावे : अंक तिसरा

# हाकारा

जुलै - सप्टेंबर २००३

## ◆ अनुक्रमणिका ◆


| | | |
|---|---|---|
| वुड लॅन्ड प्लॉट - | रा. वि. भुस्कुटे | ३ |
| भौगोलिक चिन्हे : नोंदणीकरण व संरक्षण - | सौ. मीना शेलगावकर | ७ |
| कविता : आश्रमशाळा - | उषाकिरण आत्राम | १४ |
| उमलत्या कळ्यांचे अंत्तस्थ हुंकार - | उषाकिरण आत्राम | १५ |
| बांधवगडचे बैगा आदिवासी - | डॉ. धैर्यशील शिरोळे | १९ |
| दुर्लक्षिलेल्या मोळीवाल्या महिला - | रा. वि. भुस्कुटे | २१ |
| सिकल सेल अनेमिया - | डॉ. सु. ल. काटे | ३१ |
| महिलांचे स्वयंसहाय्य बचतगट - | ग. शां. पंडित | ३५ |
| कविता : पर्यटन - | माँगीलाल राठोड | ४४ |


◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क. औंध,
पुणे - ४११००७
दुरध्वनी - २५८८४१५०
मूल्य रू. ३०/-

◆ **संपादक**
रामचंद्र मुटाटकर

◆ **कार्यकारी संपादक**
पुरूषोत्तम आगाशे

**अक्षर जुळणी**
अशोक कदम

◆ **प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
**मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०**
येथे छापून प्रसिद्ध केले.

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

हाकाराचा हा सर्वसाधारण अंक असला तरी यातील वैविध्यपूर्ण लेखांमुळे वैशिष्टपूर्ण झाला आहे.

श्री. रा. वि. भुस्कुटे हे हाकारासाठी सतत लेखन करत असतात. ठाणे जिल्ह्यातील शहापूर, विक्रमगड या तालुक्यातील आदिवासींच्या जमिनी कोणत्याही पूर्वसूचना वा फेरफाराची नोटीस न देता लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी वुड लॅन्ड प्लॉट अर्थात वन जमीन ठरवण्यात आली. या वुड ॲन्ड प्लॉट च्या संदर्भात श्री भुस्कुटे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. १९५६ साली करण्यात आलेला बदल सिमिंग्टन अहवालाच्या शिफारशींच्या विरूध्द जाणारा आहे. या घटनेला आता ५० वर्षे होत आली तरी देखील अन्यायग्रस्त आदिवासींची दखल शासन दरबारी घेतली गेलेली नाही. श्री भुस्कुटे यांनी या गोष्टीवर प्रकाश टाकून आता या आदिवासींपुढे संघर्षाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसल्याचे सांगितले आहे. मोळी विकून पोट भरणाऱ्या स्त्रिया, जंगल फाटी संदर्भातील आकडेवारी, त्यामागचे अर्थशास्त्र या सर्वांवर झोत टाकणारा श्री. भुस्कुटे यांनी अनुवादित केलेला दुसरा लेखही माहितीपूर्ण आहे.

जागतिकीकरण व आर्थिक उदारीकरणाच्या धोरणामुळे देशाची बाजारपेठ परकीय उद्योजक व व्यावसायिकांना खुली झाली आहे. यामुळे थोडाफार फायदा स्थानिक जनतेला झाला असला तरी त्याचे अनेक दुष्परिणाम मुख्यत्वे समोर येत आहेत. आर्थिकदृष्या महासत्ता असलेल्या अमेरिकेसारख्या देशांकडून भारत व अनेक विकसनशील देशांचे वेगळ्या मार्गाने शोषण होत आहे. कडुलिंब, हळद यासारख्या पदार्थांच्या औषधी गुणधर्मावरचे तसेच बासमती तांदूळ यावरचे पेटंट हा त्याचाच भाग आहे. ही पेटंट रद्द करण्यासाठी भारताला आंतरराष्टीय पातळीवर झगडावे लागले.

आपल्याकडे असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीचे खासकरून औषधी वनस्पती त्यांचे गुणधर्म वगैरेची नोंदणी करून त्याचे संरक्षण कसे करायचे याचे सखोल विवेचन सौ. मीना शेलगावकर यांनी भौगोलिक चिन्हे नोंदणीकरण व संरक्षण या आपल्या लेखातून केले आहे. जागतिक पातळीवर काय चालले आहे, त्याचा मुकाबला कसा करता येऊ शकेल; भौगोलिक चिन्हांचे नोंदणीकरण करण्यासाठी काय प्रयत्न करायला पाहिजेत याची माहिती आपल्याला या लेखातून मिळते. जैवविविधतेने नटलेला व नैसर्गिक साधन संपत्तीची खाण असलेल्या आदिवासी भागातून यासंदर्भात विशेष प्रयत्न होणे गरजेचे. त्यासाठी सरकारबरोबरच, विविध स्वयंसेवी संस्था, कार्यकर्त्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

श्रीमती उषाकिरण आत्राम यांनी आश्रमशाळातील विद्यार्थीनींवर शिक्षकांकडून होणाऱ्या अन्यायाबद्दल आपल्या लेखातून वाचा फोडली आहे. श्री. धैर्यशील शिरोळे यांनी बांधवगडच्या बैगा आदिवासींची ओळख करून दिली आहे. सिकेल सेल ॲनिमिया हा आजार आदिवासी भागातून आढळून येतो. त्यावर प्रतिबंधात्मक उपचार हाच मार्ग आहे. या आजाराविषयी डॉ.सु.ल. काटे यांनी आपल्या लेखातून माहिती दिली आहे.

गेल्या दशकामध्ये महिलांचे सबलीकरण करण्याच्या दृष्टीने पावले पडू लागली. महिलांना स्वत:च्या पायावर उभं करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यात स्वयंसहाय्य बचत गटांचा मोठा वाटा आहे. या बचत गटांच्या कार्यपध्दतीबद्दल श्री. ग.शां.पंडित यांनी ओळख करून दिली आहे.

हाकाराचा हा अंक वाचकांना आवडेल अशी आशा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.

कार्यकारी संपादक

# वुड लँड प्लॉट

### रा.वि.भुस्कुटे

महाराष्ट्र शासनाच्या १० ऑक्टोंबर २००२ च्या ठरावाच्या संर्दभात शहापूर तालुक्यातील माहुली गावी गेलो होतो. तेथे असे आढळून आले की, तेथील ४-५ आदिवासींकडे पिढ्यानपिढ्या वन जमीन कसण्यासाठी आहे. पण वनखात्याने ढुकूंनही कधी हरकत घेतलेली नाही. त्यांनी दावा केला की, सरकारनी जमीन त्याचे वडिलांना मंजूर केलेली आहे. जमीन मंजूर केल्याचे कागद त्यांचेकडे नव्हते. आणि त्यांना ते मिळतील असेही त्यांना वाटत नाही. त्यांनी दिलेली माहिती विश्वासार्ह वाटली. त्यांच्याकडील जमिनीचे सातबारा उतारे आणि फेरफार तलाठीकडून मिळवण्यात आले. त्यावरुन असे दिसून आले की, ते कसत असलेली जमीन वुड लँड प्लॉट - वन जमीन म्हणून दाखवलेली आहे. त्यांच्या पूर्वाधिका-यांची ( म्हणजे वडील, आजोबा वगैरे ) नावे ही जमीन कब्जेदार सदरी दाखवलेली होती. पण त्यांच्या नांवाला कंस केलेला आहे.

आदिवासीचे नांव कमी केल्याचा फेरफार पहाता १९५४ मध्ये तहसीलदार यांनी दिलेल्या हुकुमाप्रमाणे आदिवासीचे नाव कमी करुन त्यांच्याऐवजी वनखात्याचे नांव दाखल केलेले आहे. पण या फेराफेराची नोटीस न बजावता, गावी ती प्रसिध्द न करता आदिवासी भूधारकांना अंधारात ठेऊन फेरफार मंजूर करण्यात आला आणि त्यांची नावे कमी करण्यात आली असल्याचे स्पष्ट झाले.

विक्रमगड तालुक्यातील शेवते गांवच्या आदिवासींनी वरीलप्रमाणेच दावा केला की, ते कसत असलेली वनजमीन ही त्यांचे पूर्वाधिका-यांना मंजूर केलेली होती. त्यांनी दाखविलेल्या सातबा-यामध्ये कब्जेदार सदरी वुड लँड प्लॉट अशी नोंद होती. या नोंदीचा फेरफार पहाता तहसीलदार जव्हार यांच्या १९५६ च्या आदेशाने ही नोंद कमी केली असल्याचे स्पष्ट झाले. एवढेच नव्हे तर गेली कित्येक वर्षे त्याचे वडिलांचे आणि आजोबांचे नावे असलेल्या दोन स्वतंत्र खात्यांमधून दरवर्षी जमिनीचा धारा भरल्याच्या पावत्याही त्यांनी दाखविल्या. पण हे प्लॉट एकसाली मानता येत नव्हते. कारण सातबारा मध्ये वुड लँड प्लॉट अशी नोंद होती. आणि तसा फेरफारही केलेला होता. या गावी ७५ वुड लँड प्लॉट असल्याचे फेरफारावरुन स्पष्ट झाले. या सर्व प्लॉटस्‌चा धारा दरवर्षी ते भरत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. वरील दोन उदाहरणावरुन असे स्पष्ट झाले की, एकसाली आणि वनातील शेती करण्यासाठीची अतिक्रमणे या व्यतिरिक्त वुड लँड प्लॉट आदिवासींकडे भोगवटयासाठी वर्षानुवर्ष आहेत. ते त्यांना मंजूर केलेले होते. म्हणजे ते त्यांचेकडे कायदेशीरपणे होते. तेंव्हा मग वुड लँड प्लॉटस्‌बद्‌दल आधिक माहिती मिळवली.

## सिमिग्टंन रिपोर्टमधील शिफारशी

मॉटेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणा ब्रिटीश सरकारनी मान्य केल्याने व्दिदल राज्यपध्दती भारतात अंमलात आली. मुंबई प्रांताच्या निवडणूका १९३७ मध्ये झाल्या. आठ प्रांतातून कॉग्रेसची सरकारे स्थापन झाली. मुंबई विधानसभा स्थापन झाली. कै. बा. ग. खेर हे पहिले पंतप्रधान झाले. मुंबई प्रांतातील आदिवासी क्षेत्रामधील व्यापक असंतोषाची गंभीर दखल त्यांनी घेतली. मुंबई प्रांतातील अंशतः वगळलेल्या क्षेत्रातील (partially excluded area) म्हणजेच आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आणि डोंगरी जमातींच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत शिफारशी करण्यासाठी मि.डी. सिमिंग्टन, आय.सी.एस. यांची नेमणूक सरकारनी केली. ३१ मार्च १९३८ च्या अहवालामध्ये त्यानी अनेक शिफारशी केलाल्या आहेत. त्यामध्ये वुड लॅंड प्लॉटबाबतही दोन शिफारशी केलेल्या आहेत.

ब्रिटीश राजवटीमधील तेंव्हाच्या प्रांतिक प्रशासकीय आधिका-यांनी जंगल आणि गाव या दरम्यानच्या साधारण सपाट वन जमिनींमध्ये वुड लॅंड प्लॉटस् ठाणे जिल्ह्यात तयार केलेले होते. आदिवासींनी ते लागवडीखाली आणावेत म्हणून ते निर्मिले होते. साधारणतः १८९५ च्या सुमारास ते तयार करण्यात आले. वुड लॅंड प्लॉट नजीकची जंगल जमीन राखणे, होणा-या अवैध वृक्षतोडीची माहिती तत्परतेने वनखात्याला देणे हे प्रमुख कर्तव्य वुड लॅंड प्लॉटधारकांचे होते.

ठाणे जिल्हातील अंशतः वगळलेल्या तालुक्यांमध्ये खाली दिल्याप्रमाणे वुड लॅंड प्लॉटस् आणि त्याचे क्षेत्र होते.

| तालुक्याचे नाव | वुड लॅंड प्लॉटस्ची संख्या | वुड लॅंड प्लॉटचे क्षेत्र<br>एकर गुंठे आणे |
|---|---|---|
| शहापूर तालुका | ३,४९१ | ९४६१ - २२ - ०४ |
| डहाणू तालुका | ५,९७७ | ११६८१ - २० - ०० |
| उबंरगाव तालुका | १,२०६ | ३०७१ - १३ - ०० |
| मोखाडा तालुका | ७०० | ४७३७ - ३४ - १२ |
| एकुण | ११,३७४ | २८,९७२ - १६ - ०० |

वुड लँड प्लॉटचा मक्ता धारकाने कोणाला देण्यास किंवा कोणाकडून स्विकारण्यास मनाई होती. आणि तसे केल्यास प्लॉट जप्त करायचा होता. ही जरी शर्त असली तरी या वुड लँड प्लॉटस्मधील उत्पन्न घेण्यास सावकारांना प्रत्यक्षात प्रतिबंध होत नव्हता. वुड लँड प्लॉटस् योजनेत भूभागाच्या वैशिष्टपूर्ण रचनेमुळे एक दोष होता. तो म्हणजे हे प्लॉटस् कमी क्षेत्राचे तसेच विखुरलेले असल्याने इकॉनॉमिक होल्डिंगपेएक्षा (किमान धारणा क्षेत्रापेक्षा ) ते कमी आकाराचे होते. तेंव्हा मि. सिमिंग्टन यांनी शिफारस केली की, इकॉनॉमिक होल्डींग होण्यासाठी या प्लॉटसच्या क्षेत्रात वाढ करण्यात यावी. म्हणजे हे प्लॉटस् फायदेशीर ठरतील. तसेच ते चांगले कसता यावेत म्हणून संबंधिताना तगाई कर्ज देण्यात यावे.

काही वर्षे नियमितपणे लागवड केल्यानंतर हे प्लॉटस् सर्वसाधारण शेतासारखे होतात. मग त्यावर कब्जाहक्काची रक्कम आकारण्यात येते ती संबंधितांकडून वसूल केली जाते. किंवा हे सुधारलेले प्लॉटस् लिलावाने विकण्यात येत असत. याबाबतीत सिमिंग्टन यांनी शिफारस केली आहे. की ही पध्दती तात्काळ बंद करण्यात यावी. वुड लॅंड प्लॉटस् व्यवस्थित लागवडीस येऊ लागल्या बरोबर ते ज्यांनी कमीत कमी दोन वर्षे लागवडीला आणले असतील त्यांना कब्जाहक्काची रक्कम न आकारता तात्काळ आपोआप त्यांचे नावे करण्यांत यावेत.

मि. सिमिंग्टन, आय. सी. एस. यांनी ३१ मार्च १९३८ ला सादर केलेल्या शिफारशी अंमलात आणण्यात आल्या असे आता मानावे लागेल. ठाणे जिल्हयातील अंशतः वगळलेल्या तालुक्यात निर्माण केलेले २८,९७३-१६-०० क्षेत्रातील ११३७४ वुड लॅंड प्लॉटस् आजही ज्या आदिवासी भूधारकांच्या कब्जावहिवाटीत आहेत ते त्यांच्या वडिलांनी / आजोबांनी / पणजोबांनी खूप कष्ट करून लागवडी योग्य केल्याने कब्जाहक्काची रक्कम घेऊन किंवा शिफारशीनुसार कब्जा हक्काची रक्कम न घेता त्यांचे नावे मंजूर केलेले होते. ते त्यांचे कायमस्वरूपी हक्काचे झाले होते ही वस्तुस्थिती यावरून स्पष्ट होत आहे.

## संघर्ष अटळ आहे

वरील वस्तुस्थिती असतांनाही गांवोगावचे वुड लँड प्लॉटवर सातबाराचे कब्जेदार सदरी असलेली नावे १९५४ ते १९५६ च्या कालावधीत लेखणीच्या एका फटका-याने कमी करण्याचे हुकूम देण्यात आले. या हुकूमाने गावोगांवी फेरफार नोंदण्यात आले. आदिवासींची नांवे कमी करण्यात आली. वुड लँड प्लॉट (वन जमीन) अशी नोंद करण्यांत आली नाही. आदिवासी प्लॉट धारकांना अंधारात ठेऊन त्यांच्या अपरोक्ष जमिनीच्या हक्क पत्रकातील त्यांची नांवे महसूल खात्यानी कमी केली आहेत. उघड उघड अन्याय करण्यांत आलेला आहे हे कृत्य तद्दन बेकायदेशीर आहे तसेच मि. सिमिंग्टन, आय. सी. एस. यांच्या शिफारशींच्या अगदी विरूध्द असे निंदनीय कृत्य महाराष्ट्र शासनाच्या महसूल खात्याने केलेले आहे.

आदिवासी कल्याणाची उठसूठ भाषा बोलणा-या महाराष्ट्र शासनाच्या महसूल खात्याने १९५४ ते १९५६ या सुमारास वुड लँड प्लॉटच्या हक्क पत्रकातील नांवे कमी करून जो अन्याय्य

केलेला आहे त्याचे निराकारण उशीरा का होईना आता २००३ मध्ये ४८ वर्षानी स्वतः होऊन केले पाहिजे. वुड लँड प्लॉटवरील आदिवासींची नावे कमी करून हे प्लॉटस् वनखात्याकडे वर्ग करणारे फेरफार स्वतः होऊन (सुओ-मोटो) रद्द केले पाहिजेत. आदिवासींची नांवे पूर्ववत दाखल केली पाहिजेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या तरतूदीप्रमाणे ते त्यांना खरे पहाता करता देखील येईल. आदिवासींवर केलेला अन्याय लक्षात आल्यावर दूर करणे उचित ठरेल. परंतु आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता महसूल खाते हे करणार नाही.

उलट वन संरक्षण कायदा १९८० कडे महाराष्ट्र शासनाचे महसूल खाते सोयीस्करपणे बोट द्राखविणार आहे. आणि वन खात्याच्या आड लपणार आहे. महाराष्ट्र शासनाचे वनखाते हे केंद्र सरकारच्या वन आणि पर्यावरण खात्याच्या नियंत्रणाखाली कठपुतलीप्रमाणे काम करत असल्याने ठाणे जिल्हयातील हजारो वुड लँड प्लॉटधारक आदिवासींच्या नांवे सातबारामध्ये पूर्ववत लावण्यासाठी त्या खात्याकडून काही होईल अशी अपेक्षा करणे फोल आहे. त्यामुळे याबाबत काही प्रस्ताव वनखाते केंद्र सरकारच्या वन आणि पर्यावरण खात्याकडे पाठविण्याचे अजिबात शक्यता नाही.

तथापि पुरोगामी? महाराष्ट्र सरकारच्या लोकभिमुख धोरणामुळे वनखात्याला वुड लँड प्लॉटच्या जमिनी वनातून वगळण्याच्या प्रस्ताव नाइलाजाने पाठवावा लागला तरी देखील वनाचे क्षेत्र कोणत्याही परिस्थितीत कमी करायचे नाही. कारण त्यावर जागतिक बँकेचे कर्ज अवलंबून आहे. तेव्हा केंद्र सरकारचे वन आणि पर्यावरण खाते असा प्रस्ताव कदापिही मंजूर करणार नाही ही काळया दगडावरची रेघ आहे.

वुड लँड प्लॉट आदिवासी भूधारकांच्या आजही कब्जावहिवाटीत आहेत. कायद्याच्या भाषेत वनजमिनीतील त्यांचे हे अतिक्रमण पिढ्यान्पिढया आहे. ३१ मार्च १९७८ पूर्वीचे तर निश्चितच आहे. तेंव्हा १० ऑक्टोबंर २००२ च्या महाराष्ट्र शासनाच्या ठरावाप्रमाणे हे त्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करावे असा दावा करण्याशिवाय अन्य पर्याय सद्यस्थितीत त्यांचे पुढे आहे असे वाटत नाही. पण ही समस्या महाराष्ट्र शासनाने बिकट केली आहे याचे भान ठेवावे लागणार आहे. संबंधित आदिवासी भूधारकांना वुड लँड प्लॉट त्यांचे नावे पुन्हा नव्याने मंजूर करून घेण्यासाठी तीव्र संघर्ष करावा लागणार आहे. थोडक्यात प्लॉट कसणा-या हजारो आदिवासींनी प्रयत्नांची शर्थ केली तर वुड लँड प्लॉट पुन्हा नांवे करून घेण्याचा लढा नक्कीच यशस्वी होईल.

❖❖❖

# भौगोलिक चिन्हे (जिऑग्राफिकल इंडिकेशन ) नोंदणीकरण व संरक्षण

सौ. मीना शेलगावकर

सतत वेगवेगळ्या कल्पना करणे, त्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी झटणे, भावाविष्कारात रमणे हा माणसाच्या मेंदूत होणा-या प्रक्रियेचा स्थायीभाव आहे. कल्पनेचा आविष्कार हा प्रत्येक मनुष्याच्या बौध्दिक पातळीनुसार वेगवेगळा असू शकतो किंबहूना असतो. एवढेच नव्हे तर एकच कल्पना एकच माणूस वेगवेगळ्या स्वरुपात मांडू शकतो हा अविष्कार, त्याचा प्रकार, त्याचे स्वरूप हे एक प्रकारे बौध्दिक 'काम' आहे ( मूळ कल्पना नव्हे ) असे मानले गेले आहे. व तो आविष्कार किंवा प्रयत्न ही त्या व्यक्तीची "बौध्दिक संपत्ती' ( इंटलेक्चुअल प्रॉपर्टी ) आहे. ह्या "बौध्दिक संपत्तीचे' जतन करणे, ह्या संपत्तीचा उपयोग समाजासाठी औद्योगिक पातळीवर करणे, त्याच बरोबर या बौध्दिक अविष्काराच्या जनकाला त्यातून उत्पन्न मिळावे जेणे करून असे काम करण्या-यांना प्रोत्साहन मिळेल व त्याचा समाजाला जास्तीत जास्त उपयोग होईल. हा बौध्दिक संपत्तीचा हक्काचा ( इंटलेक्चुअल प्रॉप्रर्टी राईट्सचा ) मुख्य हेतू आहे. आंतराष्ट्रीय स्तरावरही हे संरक्षण मिळावे व त्यासाठी एक सर्वमान्य संस्था असावी या हेतूने वर्ल्ड इंटलेक्चुअल प्रॉपर्टी ऑरगनायझशेनचा उदय झाला. ही संस्था जिनिव्हा येथे असून ती सर्व प्रकारच्या अर्जाचे नियमन करण्यास मदत करते. परंतु प्रत्येक देशाला स्वतःचे कायदे स्वतः करण्यास पूर्ण मोकळीक होती व आजही आहे.

ह्या बौध्दिक संपत्तीची नेमकी व्याख्या करणे जरा गुंतागुतीचे असल्यामुळे जे देश इंटलेक्चुअल प्रॉपर्टी ऑरगनायझेशनचा ( व्हिपो ) स्थापनेच्या सभेत सामील झाले होते. अशा सभासदांनी वेगवेगळ्या हक्कांची ( राईट्स ) एक ढोबळ यादीच तयार केली. या सूचीमध्ये लेखन कला व वैज्ञानिक कामे, कलाकारांच्या कलेचा अविष्कार, सर्व क्षेत्रातले मनुष्याचे शोधाचे प्रयत्न, वैज्ञानिक शोध, औद्योगिक आराखडे , ट्रेड मार्कस् व व्यापारी नावे, अशा व ह्या प्रकारात मोडणा-या बौध्दिकतेशी संबंधित असेल अशा सर्व बाबींचे हक्क समाविष्ट करण्यात आले आहेत. एवढेच नव्हे तर संगणक प्रोग्राम व मल्टीमीडीयाशी निगडीत कार्यक्रमाचाही त्यात नंतर समावेश करण्यात आला आहे. ( कन्व्हेनशन एस्टॅब्लिशिंग द व्हिपो, स्टॉकहोम जुलै १४, १९६७. )

ह्या सर्व बौध्दिक संपत्तीची वेगवेगळ्या प्रकाराखाली वर्गवारी केलेली आहे. व त्या वर्गवारीनुसार ( उदा. कॉपीराईटस, पेटंटस्, ट्रेड मार्कस् ) वेगवेगळ्या कायद्याखाली ह्या हक्कांना संरक्षण देण्यात आले आहे. हे संरक्षण १० वर्षापासून ५० वर्षापर्यंत आहे. ह्या संरक्षणानुसार जनकाला ही संपत्ती वापरण्याचा पूर्णपणे हक्क असतो ( अर्थात तो अविष्कार किंवा शोध ( इंटलेक्चुअल प्रॉपर्टी ) हा त्या देशाच्या कायद्याला मान्य असायला हवा ) अविष्कारकर्ता, दुस-याला ही संपत्ती वापरण्यापासून मनाई करू शकतो किंवा ही संपत्ती

तो दुस-याला योग्य मोबदला घेऊन वापरायला देऊ शकतो ह्या संपत्तीवर मुख्यत्वे करून जनकाचा हक्क असतो हे हक्क काळ, ते किती वर्षासाठी असतात, त्यांना संरक्षण मिळण्यासाठी काय करायचे हा स्वतंत्र मुद्दा आहे.

आपण आज इथे चर्चेला घेतलेला मुद्दा या सर्व हक्कापेक्षा वेगळा आहे. हा हक्कही आज मोठ्या प्रमाणावर मान्यता पावतो आहे, तो म्हणजे भौगोलिक चिन्ह ( Geographical Indication) त्यांचे नोंदणीकरण व संरक्षण .

आपल्याकडे काही वाक्यप्रचार आहेत बारा मैलावर बोली भाषा बदलते, बारा गावचे पाणी पिणे वगैरे. हे वाक्यप्रचार भौगोलिक बदलाचे प्रतिक आहेत. रत्नागिरी हापूस देवगडला लावा त्याची गुणवत्ता बदलते, तसेच माणसाची राहण्याची, खाण्याची, बोलण्याची पध्दत बदलते. झाडाचे गुणधर्म बदलतात. थोडक्यात काय तर जैविक विविधता बदलते. ही जैविक विविधता ही त्या त्या भौगोलिक परिस्थितीनुसार बदलते. ती कुणा एका व्यक्तीची भौगोलिक संपत्ती नाही तर ती त्या त्या भौगोलिक परिस्थितीची एक खास देणगी आहे. ही देणगी त्या भूप्रदेशाच्या हवा, पाणी, मातीच्या एकत्रित संयोगातून तयार झालेली असते. ही खास देणगी व्हिपोने मान्य केली असून तिला बौध्दिक संपत्तीचा दर्जा दिलेला आहे. हा दर्जा लिस्बन कनव्हेनशन मध्ये प्रथम मान्य केला व नंतर "ट्रीप्स अग्रीमेंट" ( Trips = इंटरनॅशनल ट्रीटी ऑन ट्रेड रिलेटेड इंटलेक्चुअल प्रोप्रटी राईट्स ) नुसार जागतिक व्यापार संघटनेने उचलून धरला. या संघटनेच्या सर्व सभासद देशांनीही तो मान्य केला आहे. ( ह्या कराराचा फायदा भारताला बासमती तांदळाच्या पेटंट विरूध्द लढताना झाला व ह्या भारताने केलेल्या भौगोलिक चिन्हांच्या दाव्याला युरोपियन युनियन इतर सभासद देशांनी पाठिंबा दिला ) अर्थात या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संरक्षण देणा-या बाबी आहेत.

भौगोलिक चिन्हे ( जिऑग्राफिकल इंडिकेशन ) व इतर बौध्दिक संपत्तीचे हक्क ( उदा. पेटंट्स, ट्रेडमार्कस ) यामध्यले काही फरक आपण पाहू.

एखादी वस्तु बाजारात विक्रीसाठी येते तेव्हा एखादे नाव असते. सर्वसाधारण ह्या नावाला ट्रेडमार्क असे संबोधले जाते. हा ट्रेडमार्क लोगो, चिन्ह, शब्द, क्रमांक, अक्षर, घोषवाक्य, आवाज, रंग किंवा वासही असू शकतो. हे ट्रेडमार्क वस्तु-वस्तुमधील कंपनीचा मालकाचा किंवा देण्यात येणा-या सेवेला इतरांपासुन वेगळेपणा देतो. हा ट्रेडमार्क फक्त त्याच्या मालकालाच वापरता येतो. हा ट्रेडमार्क व्यक्तिगत असतो. उदा. कोलगेट.

परंतु भौगोलिक चिन्हे ही एक सुचना (नोटीस) असते, जी त्या विशिष्ट प्रदेशात बनणा-या उत्पादनाची प्रतिक असते. ही चिन्हे ह्या भौगोलिक प्रदेशांमधील सर्व उत्पादकांना वापरता येतात, त्यावर कोणा एका व्यक्तिची मालकी नसून ही चिन्हे त्या प्रदेशाची तेथील भौगोलिक वातावरणामुळे येणा-या उत्पादनाच्या गुणवत्तेची द्योतक असते. ह्याचा फायदा त्या प्रदेशातील, देशातील सर्व लोकांना वस्तु बाजारात विकण्यासाठी घेता येतो. ग्राहकालाही वस्तु विकत घेताना मिळणा-या गुणवत्तेची खात्री असते. उदा. रत्नागिरीचा हापूस आंबा, कोल्हापूरची लवंगी मिरची, वायगाव हळद, नागपूरची सोनपापडी, किंवा शँपेन ( शँपेन हा फ्रान्सचा भाग आहे. ), क्युबाचा तंबाखू अशी अनेक प्रकारची उदाहरणे देता येतील.

तसेच देवगड हापूस हा रत्नागिरी हापूस म्हणून विकता येणार नाही. तो देवगड हापूस ह्या नांवानेच विकला पाहिजे अन्यथा ती अप्रामाणिक स्पर्धा होईल. ( अनफेअर कॉम्पीटेशन )

ही अप्रामाणिक स्पर्धा रोखणे हे जागतिकीकरणामुळे भारतापुढे एक फार मोठे आव्हान ठरू शकते. काही उदाहरणे आपल्यापुढे आहेत. उदा. हळदीचे पेटंट, कडुलिंबाचे पेटंट, ही तर औषधी वनस्तीच्या लुटल्या जाणाऱ्या भांडाराची केवळ प्रतिकात्मक सुरुवात आहे. परंतु बासमती तांदुळ हे भौगोलिक चिन्हाच्या अप्रामाणिक स्पर्धेच्या खरेखुरे उदाहरण आहे असे म्हणता येईल. ही सुरुवात तर अर्थव्यवस्थेचे दरवाजे उघडण्यापूर्वीची होती. ह्या गोष्टीचे रक्षण करण्यासाठी भारताला न्यायालयाच्या चकरा माराव्या लागल्या. भारत जवळपास ४५००० टन बासमती तांदूळ निर्यात करतो. अमेरिकन राईस इंक टेक कंपनीला दिलेल्या बासमती नावाच्या पेटंटमुळे भारताचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असते त्यासाठी भरपूर पैसा व मनुष्यबळ खर्च करावे लागले.

प्रश्न आहे भारतातील प्रचंड जैविक विविधता जपण्यासाठी आपण प्रत्येक वेळेस असाच संघर्ष करणार की आधुनिकीकरणाचा फायदा आपण स्वतः करून घेणार हा ?

विदेशी कंपन्या भारताकडे वळणार त्या अशा नाविन्यपूर्ण वस्तु शोधून जगभर विक्री करण्यासाठी त्यापासून अधिकाधिक श्रीमंत होण्यासाठी. हे त्या कसे करतील. दोन मार्ग आहेत. पहिला म्हणजे ज्या भौगोलिक वैशिष्टये असलेल्या वस्तु जिथे तयार होतात ती सर्व जागाच विदेशी कंपन्या विकत घेऊ शकतात. उदा. मोहापासून बनणारी दारू बनविणारे क्षेत्र.

आजच्या घडीला मोहाची झाडे, त्याची दारू व आदिवासी ह्यात अतूट नाते आहे. जिवाशिवाचे म्हटले तरी चालेल. ही झाडेच जर उद्या त्याच्यापासुन उदा. ब्रिटिश स्कॉच असोसिएशनने हिरावून घेतली तर ? विदेशी दारूवर भारताने ७०० % ड्युटी लावली आहे. त्याविरुध्द ब्रिटिश स्कॉच असोसिएशनने ट्रीप्स अॅग्रीमेंटचे उल्लंघन केले म्हणून युरोपियन समुहाकडे तक्रार केली आहे. (आयएनएस वार्ता ,१७ जून २००१) त्यावर तोडगा म्हणुन उद्या ह्या दारूच्या कंपन्या भारतीय दारू उत्पादकांवर भारतातच दारू तयार करुन मात करू शकतात. भारतीय इतिहास ब्रिटिशांनी केलेल्या अप्रमाणिक व अन्यायकारक स्पर्धेने परिपूर्ण भरलेला आहे.

हीच गोष्ट औषधी वनस्पती नैसर्गिक रंग, अशा असंख्य बाबीना लागू होईल ह्या सर्व वस्तूंची विक्री त्या कंपनीच्या ट्रेडमार्क खाली होईल, अशावेळेस आपण फक्त आपले पारंपारिक भौगोलिक वैशिष्ट्यच हरवणार असे नाही तर इथला उत्पादक आपल्याच वस्तुंचे उत्पादन व विक्री करण्यास असमर्थ ठरेल. शिवाय आदिवासींचे काय होईल ते सर्वस्वी वेगळे.

ही भौगोलिक चिन्हे त्या त्या प्रदेशाच्या हवामानाची जमिनीची वैशिष्ट्ये असतात. त्यामुळे विदेशी कंपनी हा भौगोलिक प्रदेश इथून घेऊन जाऊ शकणार नाही हे खरे आहे. भौगोलिक परिस्थिती थोडीही बदलली तरी वैशिष्ट्ये बदलतात, उत्पादनाची गुणवत्ता बदलते. त्यामुळे भारत सरकार अशा जागा विदेशी कंपन्याना विकण्याचे टाळू शकते. एवढी राजकीय ताकद आपल्या

राजकारण्यांमध्ये आहे का हाही वादाचा मुद्दा आहे. दुसरा मार्ग आहे तो म्हणजे विज्ञानाचा.

आज विज्ञान इतके प्रगत झाले आहे, की क्लोन तयार करू शकते तर मग कृत्रिम ग्रीन हाऊस ही फारच सहज गोष्टी आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी उद्या अमेरिकेत रत्नागिरी किंवा काश्मिर चे वातावरण तयार करून तिथे रत्नागिरी हापूस किंवा काश्मिरचे केशर तयार केले तर ? भारताचा हापूस व केशराचा निर्यात उद्योग डबघाईला येईल ह्या सर्वातून वाचण्यासाठी आपण भौगोलिक चिन्हांची नोंदणी करून त्यांचे संरक्षण केले पाहिजे व आपल्या आर्थिक प्रगतीसाठी त्यांचा फायदा करून घेतला पाहिजे. कसा ते थोडक्यात पाहू.

प्रथम हे समजून घेतले पाहिजे की भौगोलिक चिन्हे म्हणजे काय ? ही एक सुचना आहे ही सुचना एखादी वस्तू किंवा पदार्थ कोणत्या भौगोलिक प्रदेशातून उत्पादित झाला हे सांगते. ह्या वस्तू शेती उत्पादनातून किंवा त्या त्या प्रदेशातील जैविक विविधतेतून तयार झालेल्या असून त्या भौगोलिक वातावरणामुळे विशिष्ट गुणवत्ता असणाऱ्या असतात. ही भौगोलिक उत्पादने वेगवेगळ्या प्रकारे संरक्षित करता येतात.

१. प्रत्येक देशाचे स्वतःचे कायदे :- सर्वप्रथम आपल्याला आपल्या देशात ह्यासाठी कायदे करणे जरूरी आहे. भारताला २००५ पर्यंत असे कायदे बनविण्याची मुभा आहे. पण ह्यासाठी आपल्याला आपली भौगोलिक वैशिष्ट्ये शोधली पाहिजेत. त्यांची प्रदेशवार व्यवस्थित सूची बनवली पाहिजे. त्याला "कम्युनिटी रजिस्टर" असे म्हणतात. ही झाली नोंदणीकरणाची प्रक्रिया. अशा सूची गावागावात बनू शकतात. परंतु ह्या सूचीमधील भौगोलिक वैशिष्ट्ये असणारी उत्पादने विज्ञानाच्या मदतीने गुणवत्ता ठरवून नोंद करायला हवीत. ही गुणवत्ताच पुढे आपल्या आर्थिक प्रगतीस उपयोगी ठरणार आहेत.

उदा. संकलेश्वर नाशिक भागात गुलाबापासुन मिळणारा अर्क हा जवळजवळ ९७% असतो परंतु तिथून तुम्ही जसे दूर जाल तसे हे अर्काचे प्रमाण कमी होते. असे वर्गनिहाय प्रदेशनिहाय नोंदणीकरण करणे व त्यापासून जास्तीत जास्त फायदा करून घेणे ही आजच्या वेगाने बदलणाऱ्या काळाची गरज आहे. सुदैवाने भारत सरकारही हळद, बासमती सारख्या आर्थिक निर्यातीवर घाला घालणाऱ्या अनुभवांमुळे जागरूक झाले आहे.

जिऑग्राफिकल इंडिकेशन (भौगोलिक चिन्हे) ऑफ गुडस ( रजिस्ट्रेशन व प्रोटेक्शन नोंदणीकरण व संरक्षण ) अक्ट १९९९ हा कायदा संसदेच्या दोन्ही सभागृहात पारित केला गेला आहे. ह्यातील कलम दोन नुसार खालील उत्पादने मालाच्या भौगोलिक चिन्हाच्या व्याख्येत समाविष्ट करण्यात आली आहेत.

१. कृषी उत्पादने उदा. पंजाबचा बासमती.

२. नैसर्गिक उत्पादने उदा. लवंगी मिरची, हापूस आंबा

३. इतर सर्व उत्पादने ज्यांची गुणवत्ता ही प्रदेशाच्या भौगोलिक वातावरण, वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्ता असणारी आहेत उदा. नागपूरची सोनपापडी, आग्र्याचा पेठा, लोणावळ्याची चिक्की (ह्याला अपीलेशन ऑफ ओरिजिन असे म्हणतात. उदा. रॉकफिल्ड चीज, स्वीस घड्याळे) ह्या कायद्याचा उद्देश उत्पादनाच्या मूळ ठिकाणाची चुकीची माहिती व दुरूपयोग

अप्रामाणिक स्पर्धेसाठी करणे, टाळणे हा आहे. ह्याच प्रकारचा दुरूपयोग इतर देशात होणाऱ्या उत्पादनाबाबत भारताने करू नये ह्याचीही हमी ह्याच कायद्यानुसार देण्यात आली आहे.

दोन : दोन शेजारी देश एकमेकांची सूची एकमेकांना देऊन दुतर्फा संरक्षण घेऊ शकतात.

तीन : आंतरराष्ट्रीय स्तरावर ह्या प्रकारचे संरक्षण प्रथमतः वापराला बंदी घालणारे आहे.

चार : ट्रिप्स (Trips) अँग्रीमेंट नुसार आंतरराष्ट्रीय स्तरावरही हे संरक्षण मिळते. अनऑथाराईज्ड युज अण्ड अनफेअर कॉम्पिटिशन तसेच जागतिक व्यापार संघटनाही आपल्या सभासद देशांनी परस्परांना भौगोलिक चिन्हांना संरक्षण द्यावे व एकमेकांना अशा प्रकारचे संरक्षण करण्यास मदत करावी हे मान्य केले आहे.

ह्या आंतरराष्ट्रीय संरक्षणाचा फायदा भारताला हळद व बासमतीचे अमेरिकेचे पेटंट रद्द करण्यास झाला.

बासमती तांदळाची केस अमेरिकन पेटंट विरूध्द लढतांना भारताला बराच त्रास झाला ह्याचे कारण म्हणजे 'बासमती' तांदुळ हिमालयाच्या रांगांमधे शेकडो वर्षापासुन तयार होत असून आपल्याकडे त्याबद्दल लिखित महिति फारशी नव्हती. म्हणजे त्याचे व्यवस्थित नोंदणीकरण झाले नव्हते. ही माहिती जमा करण्यासाठी भारताला एक उच्चपातळीवर तज्ञांचा गट तयार करावा लागला.

अपिलाचा मुख्य मुद्दा असा होता की, पारंपारिक पध्दतीने भारत व पाकिस्तान ( पंजाब हा दोन्ही देशात विभागला गेला आहे ) येथे उत्पादित होणाऱ्या बासमती तांदळास जे अमेरिकन पेटंट अमेरिकन कंपनीस दिले आहे. त्यामुळे ट्रीप्सच्या अँग्रीमेन्टनुसार ( इंटरनॅशनल ट्रीटी ऑन ट्रेड अंड रिलेटेड इंअक्युअल प्रॉपर्टी लाईटिस ) हे पेटंट 'भौगोलिक चिन्ह' ( जिऑग्राफिकल इंडिकेशन ) च्या संरक्षणाचे (प्रोटेक्शन ) उल्लंघन करते त्यामुळे अमेरिकन कंपनीच्या तांदळास 'बासमती' ह्या नावाचे अमेरिकन पेटंट दिले जाऊ शकत नाही . अमेरिकेने भारत-पाकिस्तनचा दावा मान्य करून हे पेटंट रद्द केले पण त्यानिमित्ताने एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली ती म्हणजे अशा भौगोलिक चिन्हांची नोंदणी करणे अतिशय जरूरी आहे. हे काम एका सरकारचे आहे असे म्हणणे बरोबर नाही ह्यासाठी सरकारला व्यापारी संघटना व स्वयंसेवी संस्थांनी मोठ्या प्रमाणावर मदत केली पाहिजे. कारण हा प्रत्येकाचा पोटापाण्याचा प्रश्न आहे.

## तर ही नोंदणी कशा प्रकारे करता येईल?

हा एक मोठाच संशोधनाचा विषय आहे. त्यात कायदेशीर बाबी जितक्या महत्वाच्या आहेत तितकेच लोकांमध्ये असलेली पारंपारिक माहिती जमा करणे महत्वाचे आहे. हे खरे जिकिरीचे काम आहे. हे काम स्वयंसेवी संस्था व व्यापारी संघटनांनी मनावर घेतले सहज करू शकताल. त्यासाठी काय करायला पाहिजे ! बासमती तांदळाचे उदाहरण घेऊन सुरवात करता येईल.

१. आपल्या भागात ( गाव, तालुका, जिल्हानिहाय ) अशा भौगेलिक भागानुसार कोणकोणते विशिष्ट कृषी उत्पादने, औषधी पदार्थ अथवा उत्पादित पदार्थ ( जे १९९९ च्या कायद्या अंतर्गत येतात ) त्यांची सर्वप्रथम यादी बनवणे. उदा. नागपूरला संत्री, नागपूरला बनणारी सोनपापडी

(सोनपापडीच्या बारीक सुताची गुणवत्ताही नागपूरच्या पाण्यामुळे आहे असे म्हणतात )

२. जो माल यादीत आहे. त्याची परीपूर्ण माहिती उदा. झाडे असतील तर त्यांच्या लागवडीची पध्दत, त्याला लागणारी जमीन व पाणी व हवामान पुनरूत्पादनाची पध्दत, इत्यादी जमविणे.

३. उत्पादित माल मानवनिर्मित प्रक्रियेतून जात असेल त्याची निर्मितीची माहिती.

४. मालाची गुणवत्तेनुसार वर्गवारी व त्यातील रासायनिक पदार्थाचे वर्गीकरण

५. पिढ्या न् पिढया व्यवसाय चालत आला असेल तर त्याचा इतिहास

६. पदार्थ किंवा मालाची उपलब्ध बाजारपेठ व त्याची आर्थिक उलाढाल

७. घरगुती वापरात पदार्थ किंवा माल असेल तर वापर कशासाठी होतो त्याची माहिती ( उदा. औषधी उपचार, सौंदर्य वर्धनासाठी वापर, खाण्यासाठी वापर इत्यादी )

८. सर्वात महत्वाचे म्हणजे सांस्कृतिक महत्व उदा. लग्न समारंभात नवरानवरीस 'हळद' लावणे अशा रूढीची माहिती जमा करून ती माहिती गावपातळी ते देश अशी साठवून ठेवता येईल.

भारत सरकार ह्यासाठी संगणकाच्या सहाय्याने अशी माहिती जमा करण्याच्या प्रयत्नात आहे. पण सरकारी कामाची गती काय असते हे आपल्याला ठाऊकच आहे.

जगात इतरत्र अशा प्रकारचे संरक्षण काही राष्ट्रांनी मिळवले आहे. भौगोलिक चिन्ह ही अशा उत्पादनांसाठी वापरली जातात की जो माल त्या विशिष्ट प्रदेशात बनतो आणि त्या मालाची गुणवत्ता किंवा वैशिष्ट्ये ही त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात बहुदा तो माल त्या प्रदेशाच्या नावाने विकला जातो. काही आंतरराष्ट्रीय उदा. खालीलप्रमाणे देता येतील.

१. "Tuscany" (टसकॅनी) फॉर ऑलिव्ह ऑईल हे इटलीची विशिष्ट प्रदेशात बनते व इटलीमध्ये लॉ नंबर १६९, ५ फेब्रुवारी १९९२ प्रमाणे संरक्षित आहे.

२. "Roquefort" फॉर चिज फ्रान्समधील रॉकफोर्ट भागात बनते. हे युरोपिअन युनिअनच्या रेग्युलेशन (EC) No. 2081/92 व युनायटेड स्टेट मध्ये यु एस सर्टिफिकेशन रजिस्ट्रेशन मार्क नंबर ५७१. ७९८ नुसार संरक्षित आहे.

भौगोलिक चिन्हे ही फक्त कृषी मालासाठीच वापरली जातात असे नाही तर एखाद्या विशिष्ट प्रकारच्या उत्पादनाच्या कौशल्यावर किंवा पारंपारिक पध्दतीने तयार केलेल्या मालासाठी ही वापरता येतात. उदा. लखनवी झब्बे किंवा कुर्ते, स्वीस घड्याळे, पश्चिना शाली इत्यादी.

अपीलेशन ऑफ ओरिजिन ( Appellation of Origin ) हे तर विशिष्ट प्रकारचे भौगोलिक चिन्ह आहे. जी उत्पादने केवळ भौगोलिक परिस्थीतीवर किंवा पर्यावरणामुळेच वैशिष्ट्यपुर्ण असतात अशाच विशिष्ट उत्पादनांसाठी अपीलेशन ऑफ ओरिजिन वापरले जाते. उदा. शॅपेन ही एक प्रकारचा स्पार्कलिंक वाईन आहे जी केवळ फ्रान्सच्या भौगोलिक वातावरणात शॅपेन प्रदेशात तयार होते.

भौगोलिक चिन्हांच्या वापरामुळे ग्राहक व तो एका विशिष्ट प्रकारच्या गुणवत्तेचा पदार्थ ह्यात एक दुवा तयार होतो. हा दुवा ग्राहकाला मालाच्या गुणवत्तेची खात्री देतो तसेच त्यामुळे ग्राहकाला आपल्या आवडी प्रमाणे विशिष्ट प्रकार माल निवडणे सोपे होते. वस्तुची विक्री ही त्याच्या नावावर अवलंबून असल्यामुळे अशा नावाचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर केला जाऊ शकतो. हा गैरवापर टाळण्यासाठी भौगोलिक चिन्हांची नोंदणी व संरक्षण जरूरी आहे.

भौगोलिक चिन्हाचा फायदा, वन उपजाऊ नैसर्गिक मालांसाठीही ( मायनर गुड्स प्रोड्युस्ड इन फॉरेस्ट ) घेता येईल. विषेशतः औषधी वनस्पती व इतर आदिवासींनी बनविलेल्या वैशिष्ट्पुर्ण वस्तुंसाठी.

त्र्याहत्तराव्या घटना दुरूस्तीनुसार जंगलातून जमा केलेल्या मायनर गुड्स ची मालकी आता ग्राम सभेत आहे. जंगलातून जमा केलेल्या मध, फुले, कंदमुळे एवढेच काय पण माती ( जळण व इमारतीच्या बांधकामाची लाकडे सोडून ) ह्या वस्तू तेथील ग्रामस्थांना गोळा करून नेता येतात. परंतु ह्या वस्तू सर्वसाधारणपणे ग्रामस्थ चरितार्थासाठी वैयत्तीक पातळीवर विकतात.

अशा वस्तु ग्रामस्थांना एकत्रितपणे जमा करून एकाधिकार योजने नुसार सरळ सरकारलाही विकता येतील. अशा अंदाजे २७ वस्तु एकाधिकार योजनेखाली ( Monopoly) नैसर्गिक स्वरूपातच असतील तर त्या सरकारलाच विकाव्या लागतात. परंतु नेहमी प्रमाणे ग्रामसभा, सरल खाते व जंगल खाते ह्या तिघांना एकत्र बसून घटनेतील बदलानुसार रितसर प्रणाली ठरवायला वेळ मिळालेला नाही. त्यामुळे अशा वस्तुंची खरेदी विक्री वैयक्तिक पातळीवर व खाजगी पातळीवर बिनदिक्कत सुरू आहे.

खरे तर ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार एखादी ग्रामसभा ही सर्व सूत्रे स्वतः कडे घेऊन कार्यप्रणाली करू शकते एवढेच नव्हे तर कायद्याने ग्रामसभेला हा पूर्ण आधिकार दिलेला आहे.

हा एकाधिकार कायदा नैसर्गिक उपजाऊ वस्तु तशाच स्वरूपात खरेदी विक्रीसाठी आहे. पण ह्यात थोडासा बदल करता येईल जेणेकरून सर्व ग्रामस्थांना ह्यातून आर्थिक फायदा होईल. नैसर्गिक वस्तूपासून थोडीशी प्रक्रिया करून माल बनवायचा. उदा. औषधी मुळांचे, पाना, फुला, फळांची सरळ विक्री न करता त्याची पावडर बनवायची आवळ्याचे रुपांतर आवळाकाठी किंवा मुरब्यात करायचे हा उत्पादित माल जर भौगोलिक चिन्हांअंतर्गत येत असेल तर तो ह्या प्रदेशाच्या नावाने विकायचा जेणे करून तो माल सरळ बाजारात विकता येईल त्यासाठी सरकारच्या एकाधिकार योजनेवरही अवलंबून रहायची गरज नाही. गुणवत्तेनुसार माल विकला गेल्याने त्याचा आर्थिक फायदा सर्व ग्रामसभेला होईल. हे एकप्रकारे महात्मा गांधीनी पाहिलेल्या स्वयंपूर्ण खेडेगावाचे स्वप्न पूर्ण होईल.

# आश्रमशाळा

उषाकिरण आत्राम

खरेच सांगते ग आई काही खरे नाही
आश्रमशाळा आता सुरक्षित नाही
गुरूजनांवर आता आमचा विश्वास नाही
ज्ञानदानाऐवजी प्रेम लैंगिकता शिकवतात बाई
ज्ञान ता कसले? 'अश्लीलता - शरीरसुख' शिकवतात बाई
हे सारे ऐकून - धाक - शिक्षा- शोषण अत्याचार पाहून
पळून जावे - निघून यावे - असेच वाटते आई
आई! आई ! आता आमचे काही खरे नाही खरेच सांगते गं आई ............
तु दाखविला होता विश्वास
बाबा, गावकरी म्हणायचे गुरू, "जगी महान
विद्वान गुणवान - समर्थ - पावित्र्याची खाण"
पण नाही गं आई गुरू झालेत बेईमान
आश्रमशाळेचे गुरू बनलेत दलाल....
म्हणून तर कोवळ्या कळ्यांच्या अब्रुची करतात हलाल
वरिष्ठ अधिकारीही आंधळे बहिरे - झालेत गं आई खरंच सांगते गं आई ..........
आश्रमशाळेतील आदिवासी मुली
वासना - शोषणाच्या बनल्या शिकारी
गुरूजी म्हणतात, "तुम्ही शेवटी बायाच बाया
होणारच आहात" आज ना उद्या आया
मग कशाला घाबरता? संधी घालू नका वाया
गुरूपेक्षा सांभाळणारा "कोणी नाही देवराया"
आई ग आई - माझे जीवन जाईल ग वाया
आकाश कोसळून - उर फाटतो गं आई
नको नको ही आश्रमशाळा आई ...... खरेच सांगते आई ............
हे तर ठरले आहे - नराधमाचे कुरण
आश्रम शाळा आदिवासी मुलांचे मरण
हे तर ठरले - अब्रु शोषणाचे सरण
आश्रम शाळा अत्याचार अश्लीलतेचे तार
आई आई ! हे तर आदिवासी पिढीचे जिवंत मरण
रानातले सावज - द-यातले नाग आणि वाघ बरे
पण शिकलेले माणसं - गुरु नाहींत - ग खरे
नाग वाघ सावज - प्राण्यापेक्षाही विषारी आहेत आश्रम शाळेतील माणसं
म्हणून सांगते - आई
खरेच शपथेनी सांगते आई
आश्रमशाळा आता सुरक्षित नाही खरेच सांगते आई!

# उमलत्या कळ्यांचे अंतस्थ हुंकार

**उषाकिरण आत्राम**

महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळेचे आजचे भयानक रूप पाहून आणि दिवसेन् दिवस गुन्ह्यात होणारी वाढ पाहून प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे, हे सतत असेच होत जाणार काय ? या अक्षम्य गुन्ह्याला कोणती जबर शिक्षा ? की, सारेच मुग गिळून - आश्रम शाळेतील आदिवासी मुलींचे जीवन उध्वस्त करून गुरु -तारू-सैतानाचे बच्चे असेच सुटणार काय ? आज संपूर्ण महाराष्ट्रातील आश्रम शाळा शोषण अत्याचाराचे मोकळे कुरण झालेले आहेत. महाराष्ट्राइतके कोणत्याच राज्यात आदिवासी मुलीवर अन्याय अत्याचार व शोषण झालेले नाहीत.

शासनाने दुर्गम भागांत खेड्यापाड्यातील टोल्या पाड्यावरील अंधारात अज्ञानात जगणा-या आदिवासी मुलांना जगाच्या प्रकाशाचे मित्र व्हावे म्हणून आश्रम शाळा काढल्यात, करोडो रूपये खर्च झालेत, होत आहेत, परंतु शिक्षणासारख्या पवित्र विद्यादान करणा-या गुरूंनीच आपल्या गुरूच्या नावाला शेण लावून घेतले . पोटच्या पोरीसारख्या, बहिणीसारख्या अज्ञात अजाण गरीब आदिवासी मुलींच्या अगतिकतेचा फायदा घेवून त्यांचे अतोनात शोषण केलेले आहे. आदिवासी मानस मनानी उदार - निर्मळ स्वच्छ, जीव गेला तरी बेहतर पण पाप करणार नाही, गद्दारी करणार नाही, खोटेपणा करणार नाही. म्हणूनच गुरूच्या पवित्र ज्ञानदानाच्या, विव्दत्ततेचा आदर करून त्यांचेवर पुरेपुर विश्वास टाकून पोटाच्या अबोल अज्ञात पोरी स्वाधीन केल्या. केवढ्या विश्र्वासाने त्यांची अब्रुसंपत्ती गुरूच्या स्वाधीन केली आणि इथेच घात झाला. आश्रम शाळेतील गुरूंनीच त्या कोवळ्या उमलत्या कळ्यांना बेमुर्वतखोरपणाने चुरगाळून टाकले. कित्येक आदिवासी आश्रमशाळेत सर्रास मुलींचे शारीरिक शोषण, लैगिंक शोषण, मानसिक छळ, मारहाण तसेच बुध्दीपुरस्सरपणे त्यांची फसवणूक, लुबाडणूक सुरू आहे.

वरील घटनाक्रमांत दिवसेन्दिवस वाढच होत आहे. ही चिंतेची बाब आहे. शासनाने आश्रमशाळेतील मुलांच्या शिक्षण विभागावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रकल्प आधिकारी, कर्मचारी व प्रकल्प राबविले आहेत परंतु पैसा आणि सत्तेच्या गुर्मीत ते कर्तव्य विसरले. अमाप पैसा मिळतो सत्तेचा उपयोग केला की सारे पाय चाटतात. मग आदिवासींच्या पोरींचे आयुष्य नासवले तरी त्यांची त्यांना खंत नाही - ना - लाज शरम - दुःख दुरच राहिले. परंतु माणुसकीच्या ह्रदयाला पाझर फुटला नाही. एवढे लालसेपायी, पैशापायी आधिकारी कर्मचारी पांगळे आंधळे निष्क्रिय बनलेत.

अनुदानीत आश्रम शाळाही तशाच .गोठे-बंडे बिन दार खिडक्यांचे मुलांचे गोठेच. १० १५ च्या खोलीत १२/१३ मुले कोंबलेली. ना उजेड ना प्रकाश सोयी सुविधा तर दूरच. पिण्याचे पाणी नाही. की वापरायला भरपूर पाणी नाही. बाथरूम नाही की शौचालय ! खेड्यापाड्यात जंगल रानातल्या आश्रमशाळेतील मुलेमुली सरळ तलाव

- नदी - नाले बोडक्यावर - उघड्यावर आंघोळ करतात. नैसर्गिक क्रिया उघड्यावर उरकतात. इमारती ज्या काही आहेत त्याही तशाच पांगळ्या. दार आहे तर कड्या नाहीत. खिडक्या आहेत तर तावदान नाहीत. बाथरूम आहे तर पाणी नाही. शौचालय आहे पण वीज, पाणी व दार नाही. स्वच्छता व प्राथमिक सुविधेकडे कोणाचेही लक्ष नाही. जेवणाचेही तेच हाल, शास्त्रभुत आहाराचा अभाव, कसे तरी दोन वेळचे अपुरे, निकृष्ट भोजन. आरोग्यासाठी आहार नाही तर पोट भरण्यासाठी जे वाढले ते खा - नाही तर उपाशी रहा - नाही तर घरी जा ! यातुनच कितीतरी आश्रमशाळेत विषबाधा होवून काही मुले मेली सुध्दा. आरोग्य सुविधा तपासणी दर महिन्यात व्हायला पाहिजे. परंतु आरोग्य तपासणी रजिस्टर ठेवले जात नाही. दर महिन्यात आरोग्य तपासणी ख-या अर्थाने न करता कागदावर आकडे दाखविणे एवढेच काम गुरूंचे !

अलिकडे तर आश्रम शाळेतील कृष्णकृत्य उघडकीस येत आहे आणि सामील झालेले आधिकारी कर्मचारी सारे लोटे पाटे एकाच गुरूचे चेले - आणि त्यांचे महामहात्म्य कळून चुकले आहे. म्हणायलाच आहेत - आश्रमशाळा नंदनवन, फुलबाग ! आश्रम शाळा तर बनल्या आहेत मोकळे रान - मस्तवाली पणासाठी कुरण! शरीर शोषणाचे अड्डे. व्याभिचारांसाठी कुंटनखाना . जबरदस्तीने, धाक दपटशा- अतोनात दबाब आणून कोवळ्या कळ्यांचे शोषण सुरू आहेत. महाराष्ट्र राज्यातील काही आश्रम शाळेतील घटनांनी खळबळ उडवून दिली आणि त्या समाजापुढे आल्या. स्वतंत्र लोकशाहीच्या गालावर मारलेला तमाचा व भारतीय संविधानाने बहाल केलेल्या स्वतंत्र नागरीकत्व हक्कावर केलेला हा एक निर्लज्ज बलात्कार आहे. आणि उघड्या डोळ्यांनी पाहून पाहून डोळे लावून घेणारे कानात बोटं टाकुन बहिरेपणाची भूमिका निभावणारे आपण सारे शंड, निष्क्रिय पंगू - अधू- जनावर आहोत काय ? जर नाही तर आमचे रक्त कां सळसळून पेटत नाही आणि अत्याचा-याला फासावर चढवत का नाही? पोटच्या पोरीवर व्याभिचार करतांना - आपण चूप कस? आदिवासींचे २२ आमदार ५ खासदारही मुके कसे?

खालील आश्रमशाळेतील घटना पाहू या - धुळे जिल्हातील बर्डी आश्रम शाळेत ३ मुलींचे लैंगिक शोषण होवून त्यांचेवर मातृत्व लादले गेले. चार दिवस गाजावाजा होवून संबंधितांवर निलंबनाची कार्यवाही झाली. २००२ या वर्षात पूर्ण महाराष्ट्र राज्यातील आश्रम शाळेत १ नव्हे तर तब्बल २६ मुलींचे शारीरिक शोषण झालेले आहे. ( ऑगस्ट २००२ चे वृत्तपत्र समाचार ) तेथील मास्तरांनी सतत जीवानिशी मारण्याचा, नापास करण्याचा, काढून टाकण्याचा धाक दाखवून मुलींचे शारीरिक शोषण व मानसिक छळ केलेला आहे. तर अक्कलकुवा आश्रमशाळेत एका अज्ञान मुलीवर सतत शारीरिक शोषण करून तिचे आयुष्यच बरबाद केले आहे. गडचिरोली जिल्हातील मारकोंडी आश्रमशाळेत वडील नसणा-या निराधार गरीब मुलीच्या असहायतेचा फायदा घेऊन ४८ वर्षाच्या हेडमास्तर मधुकर गोविंद कांबळीनी सतत २ वर्ष शारीरिक शोषण केलेले आहे. आणि आपले पाप लपविण्यासाठी नानात-हेचा आटापिटा करून न्याय घडवून आणले होते. परंतु योग्य वेळ आली की पापाचा घडा फुटतोच. मधुकर कांबळी सारखा बेशरम मास्तर उजळ माथ्याने मिरवतो. परंतु १४ वर्षाची अज्ञानी आदिवासी मुलगी आयुष्यातूनच

संपली त्याचे काय ? तिच्या विधवा आईला व त्या पितृछत्र हरविलेल्या निराधार पोरीला कोण न्याय मिळवून देणार!

लातूर जिल्हातील आश्रम शाळेत अपंग मुलीवर बलात्कार केला जातो ( गोपीनाथ मुंडेंनी या मुलीसाठी प्रश्न उठविला होता ) पोतदार उमरी चंद्रपूर जिल्हातील आश्रमशाळेत तर आदिवासी अज्ञान मुलीवर सतत धाक दाखवून शरीर शोषण करून मातृत्व लादून आयुष्यातून उठविले. एकच खळबळ माजली व संबंधित कर्मचा-यांवर निलंबनाची कार्यवाही झाली परंतु निलंबनाने प्रश्न सुटेल काय ? गडचिरोली जिल्हातील अड्याळ आश्रमशाळेतील कु. कोवे नावाच्या मुलीचा नुकताच मेंदुज्वरानी मृत्यु झाला. दुर्लक्षितपणा व आरोग्यसुविधेचा अभाव व कर्मचारी अधिक्षकांची बेजबाबदारवृत्ती यामुळेच कु. कोवेचा बळी गेला. कवठाळा आश्रम शाळेतील आदिवासी मुलगा नुकताच मरण पावला आहे. चंद्रपुर जिल्ह्यातील नागभिड तालुक्यातील चारगांव आश्रमशाळेतही एक मलगी मरण पावली. या सर्व आश्रम शाळा नावापुरत्याच इमारती सुविधेचा अभाव व शैक्षणिक मूल्य जेमतेम असून संबंधीत वरिष्ठ कर्मचारी कर्तव्य करण्यात कसुर करीत आहे. ह्याचाच परिपाक म्हणून आदिवासी मुलं मृत्युच्या दाढेत सापडली आहेत. मृत्यु होणं - आई वडिलांना माहित न करणं - आजारी झाले तरी उपचार न करणे - गंभीर दखल न घेणं - ही एवढी सोपी, साधी गोष्ट कशी काय समजली जाते. एवढे स्वस्त मरण झाले काय ?

राजुरा तालुक्यात रूपापेठा व बोर्डा आश्रमशाळेतही अपु-या सुविधा, अस्वच्छता व आजारपणाने, विषबाधा होवून एकेक विद्यार्थी मरण पावला आहे. या आश्रमशाळाही मुलांचे गोठे निकृष्ठ भोजन - सुरक्षित इमारतीचा अभाव, आरोग्य सुविधा कागदावर, नंदनवन होण्याऐवजी स्मशानघाट बनत आहे. चंद्रपूर जिल्हातील चारगांव आश्रमशाळेतही मुलींना मारहाण व मानसिक छळाच्या घटना घडलेल्या आहेत. तर यवतमाळ जिल्हातील जाम आश्रमशाळेत सुनिता नैताम, वर्ग १० मध्ये शिकणारी तलावात आपले कपडे धुतांना बुडून मरण पावली आहे. मोवाडा आश्रम शाळेत अन्नातून विषबाधा ( सकाळ व रात्रीचे वरण मिसळून वाढल्याने ) नैताम नावाची मुलगी तात्काळ मरण पावली तर ५५ मुले गंभीर विषबाधेनी अस्वस्थ झाली होती. सांगा किती स्वस्त होत चालले आहे मरण ! किती काळजी घेतात, किती दखल घेतात. त्या लेकरांची मायबाप, पालक होण्याची हीच लायकी काय ? नागपूर जिल्हातील बेलदा आश्रम शाळेत मंजूषा सलामे ही १८-७-२००२ रोजी पोटदुखीच्या आजाराने मरण पावली. आईवडिलांवर दबाव आणून प्रेत पुरविण्यास भाग पाडले. पुन्हा गाजावाजा होवून मंजुषाचे प्रेत उकरले. मेल्यानंतरही मंजुषाच्या मृतदेहाचे हाल होताना जबाबदार कर्तव्यदक्ष गलेलठ्ठ पगार घेऊन शासनाच्या चाकरांनी किती नेकपणाने कर्तव्य बजावले ? त्यांच्या डोळ्यत एक तरी अश्रुचा थेंब आला काय?

संकेत आश्रमशाळा चिमणाझरी, जिल्हा नागपूर योगीता पंदराम, वर्ग सातवी ही मरण पावली तर शारदा सिडाम, बोथली पांजरा आश्रमशाळेची विद्यार्थिनी रक्तकर्क रागाने मरण पावली तर संतोष कुमरे हाही याच आश्रमशाळेचा विद्यार्थी मरण पावला आहे. या आश्रमशाळेत एक वर्षात दोन मृत्यु झाल्याची माहिती मिळाली. या

आश्रमशाळा अनुदानीत असून टिनाचे शेड गुरांचे बंडे - सोयी सेवा, प्राथमिक गरजांचा अभाव व निव्वळ अनुदान लाटणे एवढेच दिसून येते. सारेच 'रामभरोसे' सुरू आहे. यवतमाळ जिल्हातील सोनूली, केळापूर, सुबला, मार्थाजून पवणार, झरी जामाणी या सा-या आश्रम शाळा सुविधांचा अभाव असणा-याच आहेत.चिमूर तालुक्यातील जांभुळपाडा आश्रम शाळेत तर चक्क मुलींचे शारीरिक शोषण,मारझोड, मानसिक छळ, हेडमास्तर रामटेके, चौकीदार, कामाठी करत होते. या घटनेला मुलींनीच वाचा फोडली- भयानक मानसिक छळ, अश्लील बोलणे, प्रेमाचे किळसवाणे चाळे, लैगिंकतेचे शिक्षण, धाक दाखवून हेडमास्तर शिकवायचे. ह्या हेडमास्तरांनी तर निर्लज्जतेचा कळस गाठला होता. तुमचे शरीर कसे दिसते, तुम्ही आंघोळ करता का, झोपता तरी मी पाहतो. तर सदा सर्वदा योग तुझा घडावा ही प्रार्थना नसून दोन प्रेमी जिवांच्या शरीर भोगाचे गीत आहे. असे हे विकृत अर्थाने हे महाशय सांगायचे. तर कामाठी खोब्रागडेला भात दे - भाजी दे - म्हटलं की ' झोपू देशील का' अशी मागणी करायचा. शरीराशी लगट करायचा. तर चौकीदारही मनमानी करून मुलींशी अश्लील बोलून शरीरास हात लावायचा. त्याहीपुढे जाऊन कामाठी निरंजनेनी दि. २४-६- २००३ रोजी चणे खाल्ले म्हणून जबर मारहाण केली.ज्योती नामदेव शेलामे, वय १० वर्षे, ५ वा वर्ग. सतत पाच दिवस तिचा डावा डोळा, नाक, कान, सुजून नाकातून रक्त येत होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेवून दोषींवर निलंबनाची व हेडमास्तर चौकीदार व कामठ्यास जेलची हवा पाहायला मिळाली. परंतु प्रकल्प कार्यालय सुस्त आहे. एकच खळबळ उडून वेळीच इतर स्थानिक संस्थानी दखल घेतली नसती तर, एवढे मोठे सत्य उजेडात आले नसते. केवढा हा जबाबदार आधिकारी कर्मचा-यांचा केवढा हा बेफिकीरपणा, मग्रुरपणा आणि मनमानी राक्षसीपणा ? चंद्रपूर जिल्हातील व गडचिरोली जिल्हातील काही आश्रम शाळा अशाच बिन दार खिडक्याच्या, वरचे छप्पर खाली जमीन अपु-या सुविधा भयानक हाल. कागदावर मात्र जमाखर्च बरोबर दिसून येतो. एकंदरीत सर्व आश्रमशाळेची गंभीर दखल घेवून शासनाने दोषी अधिकारी कर्मचा-यांवर कठोर कारवाही करावी. कोणत्याही आश्रमशाळेत शारीरिक शोषण, मानसिक शोषण,लैगिंक शोषण, होणार नाही. ह्यासाठी कायदा करावा दोषींना कठोर देहदंडाची शिक्षा व्हावी ,स्थायी समितीवर ३-४ महिला ठेवाव्यात. वर्षातून चार वेळा तरी पालक, वरिष्ठ अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकारी, कर्मचारी स्थानिक समितीच्या सभा होवून विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीवर चर्चा व्हावी. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजावून घ्याव्यात. मुलींच्या प्रत्येक आश्रमशाळेत मुख्याध्यापिका / अधिक्षका महिला असावी. आयुक्त, अप्पर आयुक्तांनी, या बाबींकडे कटाक्षाने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी. या वाढत्या घटनांना आळा घालावा. अन्यथा जनलोकात आश्रमशाळेबाबत आदिवासी पालकांचे मनात अविश्वास भीती व दुरावा निर्माण होवून कोणीही पालक आश्रमशाळेत मुलांना ठेवायला तयार होणार नाही.

समाजानेही सदर घटनेची दखल घेवून आश्रमशाळेतील कोवळ्या उमलत्या कळ्यांचे अंतरस्थ हुंदके आईच्या मनानी जाणून घ्यावे, समजून घ्यावे. विशाल ह्रदयांनी सन्मान, मान शिक्षण संस्कार करावेत - तरच आदिवासी आश्रम शाळांचे स्वप्न साकार होवून नंदनवन होईल अन्यथा मरण स्वस्त होत जाईल. आश्रम शाळा सरण मरण मास्तरासाठी कुरण ही व्याख्या लोक करतील !

❖❖❖

# बांधवगडचे " बैगा " आदिवासी

**डॉ. धैर्यशील शिरोळे.**

मध्यप्रदेशातील पूर्वीच्या रीवा संस्थानातील बांधवगडचे अभयारण्य तेथे हमखास दृष्टोत्पत्तीस पडणा-या वाघांबद्दल प्रसिध्द आहे. ह्या सुंदर अरण्यातील वृक्षसंपदा पहावी, प्राणीवैभव न्याहाळावे आणि त्याचबरोबर या अभयारण्याच्या आसपास शतकानुशतके वस्ती करून राहिलेल्या `"बैगा" ह्या प्राचीन आदिवासी जमातीतील आजारी रहिवाशांना काही वैद्यकीय मदत करता आली तर पहावी ह्या हेतूने सन २००३ च्या जानेवारी महिन्यात बांधवगडकडे जाण्यासाठी निघालो. पुण्याहुन 'ज्ञानगंगा" एक्सप्रेस कटनीला उतरून जीपने उमरिया ह्या जिल्ह्याच्या ठिकाणावरून बांधवगड अभयारण्यात पोहोचलो. कटनीपासून दिडशे किलोमीटर अंतरावर अभयारण्य आहे. अभयारण्यातील हजारो चितळे, मोर, सांबर, वराह आणि जंगलाचा राजा वाघ पाहून झाल्यावर आदिवासी रूग्ण तपासण्यासाठी आसपासच्या वस्त्यांवर जाण्याचा योग आला त्यावेळी प्रत्यक्ष मिळालेली ही बैगा आदिवासी संबंधीची माहिती .

मध्यप्रदेशातील शहाडोल, उमरिया. खजुराहो आणि छत्तीसगड प्रांतातील अमरकंटक, रायपूर ह्या भागांमध्ये बैगा आदिवासींची वस्ती आहे. १९८१ सालच्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या अडीच लक्ष आहे. त्यांच्या भाषेला 'बैगानी' भाषा म्हणतात.

त्यांच्या समजुतीप्रमाणे त्यांची उत्पत्ती परमेश्वराने निर्माण केलेल्या एका जोडप्याच्या संततीपासून झाली. बैगा आणि गोंड हे एकाच वंशाचे समजले जातात. बैगांचा चेहरा लांबट आणि नाक चपटे असते. त्यांचा वर्ण तांबूस काळा असतो, बांध्याने ते मध्यम असले तरी सशक्त असतात. ते डोक्याला फडके गुंडाळतात आणि बंडी आणि लंगोटी घालतात. स्त्रिया लुगडे नेसतात. ते फिरती शेती करतात आणि म्हणून पक्की घरे बांधून ते राहत नाहीत. बांबूच्या चटईवर माती लिंपून ते भिंती उभ्या करतात खोलीच्या मधोमध धान्यांची कणगी असते.

बैगा आदिवासीत विंझवार, कंडी, कुर्क, सावत ह्या पोटजाती आहेत त्यांच्यात उच्चनीच भेदभाव आहे. त्यांची चौदा गोत्रे आहेत, सगोत्र विवाह होत नाहीत.

रोजच्या जेवणात ते मका, ज्वारी, कुटकी, कंदमुळे, फळे, उंदिर, साप, बेडूक. मासे, खातात. गायी कोबंड्या, डुकरे, बक-या पाळतात.

हे लोक निसर्गपूजक आहेत. त्यांच्या घरात भगवान देव, दुल्हादेव, बडादेव, ठाकूरदेव, बुढीमाई, भीमसेन (पर्जन्य देव) ह्या देवता असतात. नारायण देव उंबरठ्याचा देव असतो तर रातमाई ही लहान मुलांचे रात्री संरक्षण करणारी देवी असते.

कुंवार नवरात्री, दसरा, दिवाळी आणि होळी हे सण बैगा पाळतात. त्यावेळी ते नृत्य करतात. त्यांचा शकुनापशकुनांवर फार विश्र्वास असतो. कामावर जाताना साप आडवा गेला तर ते मागे फिरतात. एकच कावळा ओढ्यावर आंघोळ

करत असला तर कोणी तरी मरणार असे समजतात जंगलातील कामांसाठी शनिवार रविवार शुभ मानतात. सोमवारी ते तेल गाळतात. प्रवासाला मंगळवारी निघत नाहीत. गुरूवार हा दिवस प्रियकराची भेट घेण्यास योग्य आहे असे मानतात . शुक्रवारी ते विश्रांती घेतात आणि शानिवारी कधी विवाह करीत नाहीत. सर्व स्त्रियांना गोंदून घेणे आवडते. गोंदले नाही तर स्वर्गात प्रवेश मिळणार नाही असे त्यांना वाटते. अविवाहित मुलीच्या पायावर गोंदत नाहीत. विवाहात स्त्रीच्या गोंदण्यातील नक्षी निरनिराळ्या प्रकारची असते. गोंदवले जात असताना त्या स्त्रीच्या नव-याने ते पहायचे नसते.

आते मामे भांवडांचे विवाह होतात. विवाहात वधू पित्याला देज मिळतो. विवाह वधूच्या संमतीने ठरतो. देज देण्याची ऐपत नसेल तर नवरा वधूच्या घरी काही काळ काम करतो आणि वधूमूल्य चुकवतो. आधी साखरपुडा होतो. काही दिवसानी विवाह होतो. मांडवात एक एकुनाचा नक्षीदार खांब रोवतात त्याला वधूच्या घरी पाच प्रदक्षिणा घालतात आणि वराच्या घरी गेल्यावर तेथील खांबाला सात प्रदक्षिणा घालतात. वधू वर एकमेकांवर मका उधळतात आणि वर वधूच्या बोटात अंगठी घालतो. नव-या मुलीचे पाय वधुचे आई वडील धुतात आणि मग गृहप्रवेश होतो आणि सामुदायिक जेवण होते. विवाहाला ब्राम्हणाची आवश्यकता नसते. घटस्फोट, विधवा विवाह मान्य आहेत.

नामकरण विधी मुलाच्या जन्मानंतर पंधरा दिवसानी होतो. घरातील, वृध्द माणसे नाव सुचवितात. प्रत्येक समारंभाच्या वेळी नृत्य आणि दारू यांना खूप महत्व असते नृत्य फारसे प्रेक्षणीय नसते पण नृत्य करायला बैगांना फार आवडते. बैलाला ते शुभ मानतात आणि बैलाचा मुखवटा घालून नाचतात. बांबूची एक विशिष्ठ प्रकारची टोपी बैगा घालतात.

मर्तिक प्रथा इतर आदिवासींप्रमाणे असते. मृत व्यक्ती सारवलेल्या जमिनीवर ठेवतात. मृताला, पुरतात किंवा अग्नी देतात. प्रेत वाहून नेताना नागमोडी चालतात. प्रेताच्या अंगाला तेल आणि हळद लावतात. पुरूषाचे प्रेत पालथे पुरतात तर स्त्रीचे प्रेत उताणे पुरतात. प्रेताशेजारी एक थाळी व तंबाखू ठेवतात. जाळले असल्यास दहाव्या दिवशी रक्षा विसर्जन करतात. मृत्यु कशामुळे झाला ह्याचे कारण शोधायचा प्रयत्न केला जातो. आणि जे कारण सापडले असेल त्याचे निवारण केले जाते.

बैगा जमातीपुढे अनेक प्रश्न आहेत त्यांच्यासाठी विकास प्राधिकरण नसल्याने कोणत्याही विकास योजना तेथे लागू होत नाहीत. त्यांच्या पारंपारिक संस्कृतीवर बाहेरच्या लोकांचे आक्रमण होऊ लागले आहे. अभयारण्याच्या निर्मितीमुळे आदिवासींची जमीन सरकारजमा झाली आहे. आणि ते भूमीहीन झाले आहेत. शासनाच्या नवीन नियमामुळे ह्या आदिवासींना वनात येणा-या उत्पन्नापासून वंचित राहावे लागते. अरण्यात रोजगार मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग ओढवला आहे. त्यांच्या कु-हाडी, कोयते जप्त केले गेले आहेत. मेंदूच्या मलेरियाने आदिवासी मृत्युमुखी पडतात. कुपोषणाचा प्रश्न त्यांना नेहमीच सतावत आलेला आहे. त्यांच्यासाठी पाठवलेले अन्न आणि इतर मदत त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही त्यांनी लावलेली पिके जप्त केली जातात. अशा प्रकारे अनेक संकटाना ह्या आदिवासींना सामोरे जावे लागते. त्यांची कोठल्याही प्रकारची संघटना नसल्याने ते सरकार दरबारी आपल्या अडचणींची दाद मागू शकत नाहीत.

# दुर्लक्षिलेल्या मोळीवाल्या महिला

रा.वि.भुस्कुटे

डोक्यावरून जळाऊ लाकडांचा भारा वाहून नेणारी मोळीवाली प्रत्यक्षात काय करते? तिचा दिनक्रम कसा असतो? भल्या पहाटे उठावे लागते. स्वयंपाक करून स्वतःच्या कच्चाबच्चांसाठी अन्न झाकून ठेवावे लागते. अंधार असतांनाच झोपडी बाहेर पडावे लागते. ती जंगलात जाते, वणवण फिरते. सुकी फाटी जमा करते त्याची मोळी बांधते, मोळी डोक्यावर घेऊन जंगलातून निघते. लाकूडफाटयाच्या या मोळीचे वजन अंदाजे ३० ते ३५ किलो असते. कधी ९-१० तर १४-१५ किलोमीटर मोळी डोक्यावर घेऊन तिला चालावे लागते. जवळच्या बाजारात किंवा स्टेशनवर डोक्यावरचा बोजा उतरवते. कोणीतरी गि-हाईक ही मोळी घासाघीस करून स्वस्तात विकत घेते. कधी ३० रू. तर कधी ४० रू. मिळतात. मिळालेल्या रकमेतून बाजार करून मुलांना खाऊ घेऊन पुन्हा झोपडीकडे वळते. साधारणतः दुपारी ३ ते ४ च्या दरम्यान ती घरी परतते. सकाळी साडेतीन ते चार वाजता दिवस सुरू होतो. आणि झोपडीत परतल्यावर तिचे काम संपते. कमीत कमी बारा तास कष्ट तिला करावे लागतात. तिचे श्रम हेच भांडवल या धंद्यात असते.

सध्याच्या ऊर्जा वापर व्यवस्थेमध्ये गंगूच्या डोक्यावरील लाकूड फाटीच्या मोळीला तसे पाहिले तर काही एक स्थान नाही. रॉकेल, गॅस, विजेच्या शेगड्या, डिझेल या आधुनिक ऊर्जा साधनांमध्ये लाकूड फाटीच्या मोळीला कवडीची किमंत नाही. जागतिकीकरणाच्या अर्थशास्त्रात गढून गेलेल्या विद्वान अर्थशास्त्रज्ञांच्या खिजगणतीतही गंगूच्या डोक्यावरील लाकूडफाटीची मोळी नाही. वनखात्याचे नोकरशहा तर तुम्हाला गंगू मोळीवाली बद्दल बोलूही देणार नाहीत. कारण ती त्यांच्या दृष्टीने बेकायदेशीर धंदा करणारी बदमाश गुन्हेगार आहे. जंगलाचा नाश करणारी, पर्यावरणाची खलनायिका आहे. जंगलाचा नाश ती करते. हे गंगूला अजिबात मान्य नाही. जीर्ण मेलेल्या सुकलेल्या जळण्यास योग्य असलेली फाटीच फक्त ती जंगलातून गोळा करते असा तिचा दावा आहे. कारण तिचे गि-हाईक चोखंदळ असते. सुकी फाटीच ते पसंत करतात आणि विकत घेतात. कोण बरोबर आहे ? आमचे जंगल नोकरशहा की गंगू मोळीवाली? या प्रश्नांचा विचार गंभीरपणे झाला पाहिजे. कारण भारतातील ऊर्जा व्यवस्थेमध्ये लाकूड फाट्याला महत्वाचे स्थान

आहे. त्याच प्रमाणे गंगूसारख्या लक्षावधी मोळीवाल्या महिला पिढयान्‌पिढया अस्तित्वात आहेत. आपल्या मुलाबाळांच्या पोटात चार घास जावेत म्हणून गंगू मोळीवालीला रोज जिवघेणे कष्ट करावे लागतात. आम्ही हे असेच चालू द्यायचे का? तिचे कष्ट सुसह्य करण्यासाठी आम्ही काय करू शकतो? समाजाला तिचे विस्मरण होणार नाही म्हणून आम्ही काय केले पाहिजे?

**अस्तित्वहीन लोक**

'वनातील उत्पादने गोळा करणारे लाकूड तोडे' या वर्गामध्ये १९८१ च्या जनगणनेमध्ये मोळीवाल्यांचा समावेश केलेला आहे. तथापी ते करत असलेल्या उद्योगाला आर्थिकदृष्टया, त्याचप्रमाणे ते कोण आहेत याला अगदीच क्षुल्लक स्थान दिलेले आहे. तसेच १९९१ आणि २००१ च्या जनगणनेमध्ये देखील मोळीवाली म्हणजे खिजगणतीत नसलेली, अर्थव्यवस्थेत काही एक स्थान नसलेली, अस्तित्वहीन वर्ग आहे. मात्र १९९८-९९ च्या नॅशनल सॅपल सर्व्हेमध्ये 'गृह उद्योगातील स्वंयरोजगार म्हणून त्यांची वर्गवारी केलेली आहे.

'सिटीझन्स रिपोर्ट ऑन द स्टेट ऑफ इंडियन एनव्हायरनमेंट' च्या दुस-या अहवालात मात्र या मोळीवाल्यांच्या अस्तित्वाची दखल घेतलेली दिसून येते. लाकूड फाट्यांच्या धंद्यात ३ ते ४ दशलक्ष मोळेकरी असल्याचा अदांज त्यात दिलेला आहे. नंतर हा आकडा वाढून ११.८ दशलक्ष झाला. ऊर्जा क्षेत्रातील सर्वात जास्त लोकांना उद्योग पुरवणारा हा धंदा आहे. शहरी क्षेत्रामध्ये एकूण लाकूडफाटयाच्या वापरापैकी वनखात्याच्या ताब्यातील जमिनीमधून ५०ऽ पुरवठा होतो. हे गृहीत धरून हा अंदाज केलेला आहे. दुसरा सेंकड सिटीझन्सचा अहवाल १७ वर्षापूर्वीचा आहे. परंतु डोक्यावरून लाकूडफाटा वाहून नेणा-या मोळीवाल्या बाया अजुनही अस्तित्वात आहेत. इंडियन इन्स्टीट्युट ऑफ फारेस्ट मॅनेजमेंट, भोपाळ या संस्थेच्या सर्वेक्षणानुसार यापैकी ७० ऽ महिला आहेत. तर याच संस्थेच्या रामप्रसाद आणि पी. भट्टाचार्य यांच्या पहाणीनुसार वनजमिनीतून डोक्यावरून फाटी वाहून नेणा-या मोळीवाल्या स्वतःच्या घरची गरज भागविण्याव्यतिरिक्त ६ लाख टन लाकूडफाटा दरवर्षी गोळा करतात. तर राजस्थानमधील कमी होत जाणा-या वनातून ४ लाख कुटुंब जळाऊ सुकी फाटी जमा करतात. देशभर लाकूड फाटा डोक्यावरुन वाहून नेणारे मोळीवाले अस्तित्वात आहेत. परंतु त्यांचे हे अस्तित्व मात्र बेकायदेशीर मानण्यात येते.

१९२७ च्या भारतीय वन कायद्यात आणि सध्याच्या वन व्यवस्थापनामध्ये वनजमिनीमधून जळाऊ लाकूड गोळा करणे ही एक सवलत म्हणून मान्य केलेली आहे. जळाऊ लाकडाची गरज भागविण्यासाठी वनातील काही भाग 'वुड प्लॉट' म्हणून पूर्वी अस्तित्वात असत. सध्या ते वुड प्लॉट अगदी निकृष्ट अवस्थेत आहेत. तसेच कायद्याने दिलेल्या या आधिकाराबद्दल लोकांमध्ये घोर अज्ञान आहे. परंतु दैनंदिन जळणाची गरज भागविण्यासाठी तसेच कसेबसे जगून राहण्यासाठी उत्पन्नाचे साधन म्हणून वनात जाऊन लाकूड फाटा गोळा करावाच लागतो. याला अन्य पर्याय नाही आणि या सहज नैसर्गिक प्रक्रियेमध्ये

कायद्याच्याा भाषेत त्या स्वतःला गुन्हेगार ठरवून घेतात.

ही देखील वस्तुस्थिती आहे की, जळणाची लाकडे पुरविण्याची जबाबदारी वनखात्याने आता झटकून टाकली आहे. याबाबत वनामध्ये असलेल्या लोकांच्या आधिकाराची माहिती त्यांना न होऊ

देण्यामध्ये, त्यांना आधिक स्वारस्य आहे. त्यामुळे अर्थातच डोक्यावरून लाकडाची फाटी वाहून नेणारी मोळेकरी हाच केवळ जगंलातील जळणाचा लाकूड फाटा पुरवणारा एकमेव स्त्रोत शिल्लक राहिला आहे.

१९९० पर्यंत वनखाते जळणाचे डेपो चालवत होते. वनाचा व्यापारी फायद्यासाठी वनखाते वनाची तोड करते. झाडांच्या बुध्यांचा इमारती लाकूड म्हणून विक्री करते. फांद्यांचा जळणाची फाटी म्हणून उपयोग करण्यात येई. सर्वोच्च न्यायालयाने झाडे तोडण्यास बंदी केली आणि सरकारने जळणाचे डेपो बंद करून टाकले. तथापि मध्यप्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड, या राज्यातून अजूनही जळाऊ लाकडाचे डेपो चालू आहेत. या डेपोतून पुरवठा होणा-या जळाऊ लाकडाचे सर्वेक्षण जे करण्यात आले त्यानुसार या राज्यातील एकूण ऊर्जा गरजेपैकी अवघी १०ऽ ची गरज वन डेपोतून भागविली जाते. तर राहिलेल्या ९० ऽ जळणाची गरज डोक्यावरून, सायकलवरून लाकूडफाटा वाहून नेणा-यांकडून भागविली जाते.

वनरक्षक (गार्ड) मोळीवाल्यांना सतावतात त्यांच्याकडून डोक्यावरील प्रत्येक भा-यामागे ५ ते १० रूपये वसूल करतात. तर महसूल आणि वनजमिनीतून जळण गोळा करणा-यांवर ग्रामपंचायत आधिकारी कर बसवितात. बस आणि रेल्वेने शहरात लाकूडफाटा नेणा-या मोळीवाल्यांकडून बस आणि रेल्वे कंडक्टर पैसे वसूल करतात. ही सर्व बेकायदेशीर, भ्रष्टाचारी, लाचलुचपत मोळीवाल्या बायांना करावीच लागते. असे असले तरी डोक्यावरून लाकूडफाटा वाहून नेणा-यांचा धंदा बंद पडलेला नाही. कारण शहरातील झोपडपट्टीत राहणारे लाखो रहिवासी अजूनही जळणासाठी लाकूडफाटीचाच वापर करतात.

नॅशनल कौन्सील ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्चचे ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ आय. नटराजन यांनी ‘फायरवूड बॅलन्स इन, १९९०’ या त्यांच्या प्रबंधामध्ये केलेल्या मांडणीमध्ये शहरी भागात झालेला बदल मंद गतीने झाला असल्याचे दृष्टोपत्तीस येते असे नमुद केलेले आहे. नागरी केंद्रामधील १९७८-७९ मध्ये जळाऊ लाकडांचा वापर १६.५ दशलक्ष टनावरून १९८३-८४ पर्यतच्या कालावधीत ९.५ दशलक्ष टनापर्यात कमी झाला असल्याचे आय. नटराजन यांनी दाखवून दिले आहे. १९९१ च्या जणगणनेमध्ये देखील याला पुष्टी मिळाल्याचे आढळून येते. १९९१ च्या जणगणनेनुसार भारतातील एकूण १५१ दश लक्ष घरांपैकी (नागरी ३९ दशलक्ष आणि ग्रामीण १११.५ दशलक्ष ) नागरी केंद्रातीलही ३९ टक्के घरे जैविक जळणावर ( म्हणजेच शेण, लाकूडफाटा वगैरे ) अवलंबून असल्याचे खाली दिलेल्या आकडेवारीवरून आढळून येते.

| | नागरी मागणी | | ग्रामीण मागणी | |
|---|---|---|---|---|
| | १९९४-९५ | १९९९-२००० | १९९४-९५ | १९९९-२००० |
| कुटूंबे [दशलक्षांमध्ये] | ४३ | ५१.१८ | १०५.७९ | १०९.६ |
| एकूण कुटूंबाची ज्वलनाची मागणी पैकी | ६९.५७ | ८६.७२ | १३२.८० | १४६.७ |
| एल.पी.जी | २४.९१ | २७.६८ | ० | ० |
| सॉफ्ट कोक | ७.२० | ७.२० | २.२८ | २.२८ |
| रॉकेल | ३१.८६ | ४८.७१ | ३.५० | ३.९६ |
| लाकूडफाटा | २२.१० | २१.८६ | ८४.३३ | ९६.११ |
| दशलक्ष टन | २४.७० | २४.५७ | १३८.९ | १५९.४ |
| शेणाच्या गोव-या | ० | ० | २०.० | २०.० |
| टाकाऊ वनस्पती | ० | ० | २१.८१ | २३.५९ |

ज्वलनाच्या वापरामध्ये झालेला हा बदल प्रामुख्याने नागरी केंद्रामधूनच झालेला आहे. असे या दोन्ही अभ्यासांमध्ये नमुद केलेले आहे. आय. नटराजन यांच्या प्रबंधामध्ये प्रामुख्याने हे दाखवून दिले आहे की, 'भारतातील ग्रामीण भाग अद्यापही फार मोठया प्रमाणावर जैविक आधारित जळणांवर म्हणजेच लाकूडफाटा, शेण, काडी कचरा वगैरेवर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील ९२% कुटुंबे जळणासाठी लाकडाची फाटी, शेणाच्या गोव-या शेतामधला काडीकचरा वापरतात हे या अहवालात स्पष्टपणे नमुद केलेले आहे. १९९१ च्या जणगणनेने प्रबंधात मांडणी केलेल्या या वस्तुस्थितीला दुजोरा दिलेला आहे. १९९० च्या दशकात हीच परिस्थिती थोडया फार फरकाने चालू राहिली असली तरी त्याचवेळी थोडे गोंधळात टाकणारे वेगळे वळण लागलेले आहे.

तज्ञ गटाने १९९२ मध्ये २०१ जिल्ह्यातील ४९ हजार कुटुंबाचा अभ्यास केला. अपारंपारिक ज्वलन साधनांचा पायाभूत अभ्यास करणे हा त्यामागचा उद्देश होता. ग्रामीण क्षेत्रातील सर्वेक्षणामध्ये ज्वलनाची गरज आणि प्रत्यक्षातला वापर यामधील फरकाचा यामध्ये विचार केला आहे. आदर्श राहाणीमानासाठी ज्वलनाची किती गरज आहे. याचाच फक्त विचार आतापर्यंत केलेल्या ग्रामीण भागातील सर्वेक्षणामध्ये केलेला दिसून येतो. प्रत्यक्षातल्या वापराबद्दलचा निश्चित अंदाज करण्यात आलेला नाही. एक प्रकारे नवा पायंडा या अभ्यासाने पाडण्यात आलेला आहे. ग्रामीण क्षेत्रामध्ये लाकडाची फाटी हेच जळणाचे प्रमुख साधन असल्याची व्दिरूक्ती याही सर्वेक्षणात केलेली आहे. प्रत्येक व्यक्तीकरता स्वंयपाकासाठी ज्वलनाचा वापर दर दिवशी १.२१ किलोग्राम आहे. तर शेणाच्या गोव-या आणि शेतातील काडी कच-याचे प्रमाण दर दिवशी प्रत्येक व्यक्तीसाठी अनुक्रमे ०.४१ किलोग्रॅम आणि ०.४७ किलोग्रॅम आहे.

त्यानंतर मात्र बायोमास आधारित जळणाच्या ग्रामीण भागातील वापरामध्ये लक्षणीय बदल झाला.

शेण आणि शेतामधील काडीकचरा, धसकट वगैरेचा जळणासाठीचा वापर कमी झाला. म्हणजेच लाकूड फाटीचा उपयोग जळणामध्ये जास्त होऊ लागला काय ? १९९५ चा एन.सी.ए.ई. आर. चा अभ्यास विश्वासार्ह मानला तर त्याचे उत्तर होय आहे. या अभ्यासामध्ये असे दाखवून दिले आहे की. ग्रामीण भागामध्ये मागच्या तुलनेत जळणाचा वापर खूपच वाढला आहे. १९९२-९३ मध्ये दगडी कोळशाऐवजी घरगुती उपयोगासाठी वापरण्यात येणारे जळण एकूण १५३.८ दशलक्ष टन होते. १९७८-७९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानंतर दरवर्षी घरगुती जळण वापरात दरसाल ४ टक्के वाढ झाल्याचे आढळून आले. म्हणजे१९७८-७९ मध्ये एकूण जळण ७८.८५ दशलक्ष टनाऐवजी १९९२- ९३ मध्ये जळण वापर १३१.३७ दशलक्ष टन झाला. म्हणजे असेही म्हणता येईल की, १९७८-७९ मधील प्रत्येक कुटुंबाची जळण वापरामध्ये ५४.५७ टक्क्यावरून १९९२-९३ मध्येही वाढ ६१.२ % झाली. या अभ्यासाने हे मात्र प्रस्थापित झाले की, जैविक जळणामध्ये लाकूड फाटयाची भूमिका अहम् आहे. जरी शेणाच्या जळणाचा वापर १९७८-७९ मधील ६६.८७ दशलक्ष टनांवरून वाढून १९९२-९३ मध्ये ८६.७३ दशलक्ष टन झाला असला तरी टक्केवारीच्या हिशेबाने १९७८-७९ मधील २२.५१ टक्क्यावरून १९९२-९३ मध्ये १७.० टक्के इतका कमी झाला. त्याचप्रमाणे शेतातील चारा, धसकट वगैरे जळणाचा वापर १९७८- ७९ मधील १७.७१ टक्क्यावरून १९९२-९३ मध्ये १३.२५ टक्के इतका कमी झाल्याचे आढळून आले आहे.

ग्रामीण जळण वापराचा हा इतिहास आणि ही आकडेवारी गंगू मोळीवाली आणि तिच्या सारखे असंख्य यांच्या दुष्टीने खूप अर्थगर्भ आणि लक्षणीय ठरते. जळणाच्या या अर्थशास्त्राचे प्रमुख आधारस्तंभ लाकूडफाटा डोक्यावर वाहून नेणा-या मोळीवाल्या बाया आहेत. केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाच्या मते या व्यवसायातील एकूण उलाढाल १६.२४ अब्ज अमेरिकन डॉलर एवढी प्रचंड आहे. असे असले तरीही गंगू मोळेवाली आणि तिच्यासारख्या लक्षावधींचा हा व्यवसाय बेकायदेशीर मानण्यात येतो. पण तरीही हा धंदा अव्याहतपणे चालू आहे. कारण जळणासाठीची मागणी खरीखुरी, कधीही न संपणारी आहे. लाकूडफाटयांचा पुरवठा करणारे फक्त मोळीवालेच आहेत. तेव्हा त्यांच्या अस्तित्वाबददल कोणीही यत्किंचितही संशय घेऊ शकत नाही. ही अशी वस्तुस्थिती असूनही गंगू मोळेवाली आणि तिच्यासारख्या लोखो महिला व्यवसायात विनाकारण का अडखळत आहेत? त्यांचा हा व्यवहार नित्याचा, अत्यावश्यक असला तरीही त्याला समाज आणि सरकार मान्यता का बरे देत नाही?

देशामध्ये सर्वत्र प्राथमिक आणि दुय्यम बाजारांमध्ये जळणाचा व्यापार प्रचंड प्रमाणावर राजरोस चालतो. आणि याबद्दल आश्चर्य वाटायचे कारण नाही. बाजारामध्ये लाकूडफाटयांचा पुरवठा करणारे केवळ मोळीवालेच असतात. असा दावा करण्यात येतो. तर वनाचे सौंदर्य नष्ट करणारे पर्यावरणाचा हास करणा-या मोळीवाल्या महिला आहेत असा दावा त्यावेळी केला जातो.

या दाव्याचा मुख्य पाया कोणता आहे? तो कितपत साधार आहे?

हा दावा म्हणा की कल्पीत कथा म्हणा याचा मूलभूत आधार १९७४ चा एफ. पी. सी. चा अहवाल आहे. भारतातील लक्षवधी कुटुंबे लाकूडफाट्यावर कशी अवलंबून आहेत. हे नमुद करतांना त्याचवेळी असेही प्रतिपादन करण्यात

आले आहे की, त्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर वनाचा -हास झालेला आहे. तर १९८८ च्या वनसर्वेक्षणाचे शेवटी काढलेल्या निष्कर्षामुळे वरील दोषारोप वज्रलेप आहेत.

जळण वापराचे अभ्यास असे दर्शवितात की, जळण म्हणून लाकूडफाट्यांचा वापर प्राधान्याने होतो. त्याचवेळी वेगवेगळ्या राज्यातील वनखाती सातत्याने दर्शवित आली आहेत की, भारतीय वनांमधून कायदेशीरपणे प्राप्त होणारे लाकूडफाटा जळण फारच कमी आहे. हे जर खरे असेल तर प्रश्न निर्माण होतो. मग बाकीचा लाकूडफाटा येतो कोठून? तज्ञ लोकांनी याबाबत नेहमीच युक्तीवाद केलेला आहे. की, हा बाकीचा लाकूडफाटा जंगलातून बेकायदेशीरपणे येतो. या मोळीवाल्या

बाया वनामध्ये प्रवेश करून बेकायदेशीर वृक्षतोड करतात. वनाचा सत्यानाश करतात.

परंतु असेही अभ्यास आहेत की, ते काही वेगळीच मांडणी करतात. १९९५ च्या एन. सी. ए. इ. आरच्या सर्वेक्षणामध्ये भारतातील काही प्रमुख राज्यातील ग्रामीण क्षेत्रात वापरण्यात येणारे जैविक जळणाचा वापर तसेच पेट्रोलिअम आधारीत जळणाचा वापर दर्शविणारी माहिती अंतर्भुत केलेली आहे. ती लक्षणीय असल्याने खालील तक्त्यात दिली आहे.

| राज्य | लाकूडफाटा | बांबू | शेतातील काडीकचरा | शेण | रॉकेल | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मध्यप्रदेश | ६८.२० | - | ५.९० | १३.९० | ०.९० | — | १००-०० |
| पं. बंगाल | ५६.३३ | - | ११.५२ | ४.७३ | ०.९२ | २६.५० | १००.०० |
| आसाम | ६१.०० | २७.६९ | ११.३० | - | ०.२० | ०.२० | १००.०० |
| महाराष्ट्र | ८१.०० | — | ६.०० | — | ४.०० | २.०० | १००.०० |
| केरळ | ५३.६० | - | ९.८० | - | १२.२० | २४.४० | १००.०० |
| उत्तरप्रदेश | ९५.०० | - | - | १.०० | २.०० | २.०० | १००.०० |
| गुजरात | ८५.०० | - | २.०० | ३.०० | ५.०० | ५.०० | १००.०० |
| ओरिसा | ८८.०० | - | - | - | १२.०० | - | १००.०० |

१९७८-७९ च्या तुलनेत ग्रामीण भागातील कुटुंबे आता उत्तम दर्जाच्या जैविक जळणाचा वापर करू लागली आहेत. आता जळणासाठी वेली, फांद्या. काटक्या कुटक्यांचाच केवळ वापर करत नाहीत तर ओंडक्यांचाही उपयोग करु लागले आहेत. वेली, फाद्यांचा जळणासाठी केला जाणारा वापर१९७८-७९ मध्ये ३५.६३ % होता तो कमी

होऊन १९९२-९३ मध्ये २९.११ % झालेला आहे.

तर ओंडक्यांचा जळण म्हणून १९७८-७९ मधील वापर १८.९५% होता तो वाढून १९९२- ९३ मध्ये ३२.९४% झाला.

१९७० ते १९८० या दशकातील ग्रामीण जळण अरिष्टांबाबत करण्यात आलेल्या आरडाओरड्याचा वनाच्या झपाट्याने होणा-या -हासाशी जोडण्यात आलेल्या संबंधामधील फोलपणा आता जाणवू लागला आहे. चांगल्या प्रतीच्या लाकूडफाट्यांचा म्हणजे ओंडक्यांचा वापर जर आधिक प्रमाणात १९९० मध्ये होऊ लागला असेल तर त्याचा अर्थ आता जळणावरील अरिष्ट संपुष्टात आले असा होतो. त्याचप्रमाणे याचा असाही अर्थ होतो की, वनाव्यतिरिक्त अन्य साधनांपासून लाकूडफाटा आता प्राप्त होऊ लागला आहे. असेही आढळून आले आहे की, पूर्वीदेखील लोक वनातील लाकडांचाच वापर फाट्यांसाठी करत होते असे नाही तर वनाव्यतिरिक्त अन्य साधनांचा वापर ते करत होते.

स्वतःच्या शेतजमिनी किंवा लागवडीमध्ये नैसर्गिकपणे वाढलेली तसेच स्वप्रयत्नाने वाढवलेल्या वृक्षराजीचा जळणासाठी वापर करण्यात येत होता. आणि आजही करण्यात येत आहे. जैविक जळणाचा हा एक अविभाज्य भाग आहे. निकृष्ट दर्जाच्या वेली, फांद्या, काटक्याकुटक्या, पालापाचोळा जळणाऐवजी उत्तम दर्जाच्या लाकूडफाट्यांच्या म्हणजे ओडक्यांच्या वाढत्या वापरामागची ही वस्तुस्थिती आहे. १९८० च्या दशकात भारतातील अनेक राज्यसरकारांच्या वनखात्यांनी सामाजिक वनीकरणाचा एक भाग म्हणून सुरू केलेल्या वनशेतीची ही यशस्वीता आहे. बाजारात चांगला भाव मिळावा, आधिक फायदा व्हावा म्हणून शेतक-यांनी आपल्या शेतातून चांगले उत्पन्न देणा-या झाडांच्या प्रजातींची लागवड केली. सुरूवातीच्या बाजाराचे लक्ष साहाजिकच बांधकामासाठी लागणा-या इमारती लाकडाचे होते. काही काळाने बाजारातील ही गरज संपुष्टात आली. तेंव्हा अर्थातच शेतक-यांनी वनशेती मधील आपला माल कागद आणि रसायन कारखानदारांना लगदा तयार करण्यासाठी विकावयास सुरूवात केली. वृक्षांच्या लाकडापासून म्हणजे जैविकांपासून तयार हेणा-या लगद्यावरील आयात कर भारत सरकारने १९८० दशकाचे मध्याला कमी केला, परिणामी वनशेती करणा-या शेतक-यांची लगद्याची मागणी संपुष्टात आली. या बदललेल्या परिस्थितीमध्ये त्यांच्या वनशेतीमधील उत्पादन ओंडके पाडून लाकूडफाट्यासाठी विकण्याव्यतिरिक्त अन्य पर्याय त्यांच्यापुढे राहिला नाही.

दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे "प्रोसीपीस ज्युलिओफ्लोरा" या प्रजातीच्या वृक्षांचा सर्व राज्यांमधून मोठ्या प्रमाणावर अभूतपूर्व प्रसार याच काळात झाला. या वृक्षांच्या लाकडांचा जळणाची फाटी म्हणून वापर सुरू झाला.

एन. सी. ए. इ. आर च्या १९९५ च्या सर्वेक्षणानुसार स्वतःच्या मालकी शेतजमिनीतून प्राप्त होणा-या लाकूडफाट्यांतून ४८.५०% गरज भागवली जात होती. तर लाकूडफाट्यांची वनातून भागवली जाणारी गरज १९७८-७९ मध्ये ३५.४५% होती. ती कमी होऊन अवघ्या १५% पर्यंत घसरली. वनातील वृक्षतोडीवर बंदी घालणारे कायदे राज्यसरकारानी या कालावधीत केल्यामुळेही ही घसरण झाली आहे. या क्षेत्रातील अभ्यासक आता .या निष्कर्षाला आले आहेत की, जळणासाठीच्या लाकूडफाट्यांची गरज वनातून आता अवघी ३०% पर्यांतच भागवली जाते.

लाकूडफाट्यांच्या स्थिर किंमती त्यामध्ये होत असलेली चढउतार हे देखील डोक्यावर फाटी वाहून नेणा-या मोळीवाल्यांनी वनाचा -हास केलेला नाही हे ओळखण्याचे महत्वाचे लक्षण मानता येईल. आय. आय. एफ.एम, भोपाळ आणि इंदिरा गांधी नॅशनल फॉरेस्ट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने "वुड फ्युएल ट्रेड इन इंडिया" {भारतातील लाकूड जळणाचा व्यापार} या विषयावर फेब्रुवारी १९९९ मध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये १९८० च्या दशकात लाकूडफाटयांचे भाव स्थिरावले अशी उपस्थित तज्ञांनी मांडणी केली होती. हिमाचल प्रदेशाच्या सिमला लेबर ब्युरोच्या अहवालानुसार भारतातील बहुतेक सर्व मोठ्या शहरातील लाकूडफाट्यांचे भाव १९८५-१९९० च्या दरम्यान सर्वत्र बहुशः सारखे होते. म्हणजे स्थिर राहिले होते.

### नवा दृष्टीकोन

काहीही करून जगून रहाण्याच्या चढाओढीमुळे डोक्यावर लाकडाची मोळी मैलोन्मैल वाहून नेण्याचा हा व्यवसाय सुरू झाला आहे. आणि तो दशकानुदशके टिकून आहे. लहान शेतक-यांच्या कसेही करून जगून रहाण्याच्या गरजेवर हा व्यवसाय स्वार झालेला आहे. शेतीतून पुरेसे उत्पन्न घेण्याकरीता सुधारीत बी, बियाणे, खते, किटकनाशके, सिंचन वगैरेसाठी भरीव गुंतवणूक छोट्या शेतक-यांना करावी लागते. अल्प अत्यल्प भूधारकांना ते परवडत नाही. शेतीसाठी कराव्या लागणा-या श्रमशक्तीचे प्रमाण १९५०-५१ मध्ये ९८% होते आता ते प्रमाण घसरून १९९५-९६ मध्ये अवघे २०% झाले आहे. भारतातील शेतीव्यवसायात असलेल्या ६३ % लोकांना त्यांच्या शेतीतून मिळणा-या उत्पन्नाला इतर संसाधनाची जोड द्यावी लागते. त्याशिवाय त्यांचे भागत नाही. कारण वर नमूद केल्याप्रमाणे शेती व्यवसाय आतबट्टयांचा झालेला आहे. या परिस्थीतीत गंगुने डोक्यावरून लाकडाचे फाटे वाहून नेण्याचे काम सुरू केले. योजना आयोगाचे माजी सचिव एन. सी. सक्सेना यांच्या मते पर्यावरणीय समतोल ढासळल्यामुळे गांवातील सर्व संसाधने आटून गेली आहेत. तेंव्हा हातात अजिबात पैसा नसणा-या लोकांना डोक्यावरून मोळी वहाण्याचा धंदा हा एकमेव फायदेशीर पर्याय वाटू लागला. कारण त्यासाठी शारीरिक श्रमाव्यतिरिक्त काहीही गुंतवणूक करावी लागत नाही.

लाकूडफाट्याचे जळण गोळा करण्यावर जर बंदी आणली किंवा बंधने टाकली तर त्यामुळे मानवी दुखाःमध्ये अधिकच भर पडते. हजारीबाग जिल्हयातील चुरचुर, मांडू आणि सदर या तीन पंचायत गटातील ४५ गांवामध्ये केलेल्या सर्वेक्षणाबद्दल चंदीगड येथील वनतज्ञ मधू सरीन यांनी एक अहवाल सादर केलेला आहे. सुमारे १९००० आदिवासी महिलांना वन संरक्षणासाठी जवळच्या वनात जाण्यास मनाई करण्यात आली. डोक्यावरून लाकडाच्या फाटीची मोळी वाहून नेण्याऐवजी, झडलेली पाने, शेणखत वगैरे जैविक खते स्वयंपाकासाठी वापरण्याची त्याच्यांवर सक्ती करण्यात आली. तेव्हा त्यांनी गावठी दारू करायला सुरूवात केली. कोणत्याही अटींवर अगदी कमी वेतनावर वीट भट्टीवर त्या जाऊ लागल्या. किंवा त्या वेठबिगार झाल्या. झारखंडमधील संथाळ परगण्यातील २० गावातील वन संरक्षण आणि व्यवस्थापन समितीचे कामकाज सुरू झाल्या पासून एका वर्षात ते कोसळून पडले. या प्रकरणामध्ये

सर्व महिला मोळीवाल्या बायांचा एक मात्र कळीचा प्रश्न होता. आम्ही खायचे काय? जगावे कसे?

संयुक्त वन व्यवस्थापनामध्ये सहभागी व्हा म्हणून महिलांचे मन वळविण्यासाठी गेलेल्या पश्चिम बंगाल मधील वन आधिका-यांना याच प्रश्नाला सामोरे जावे लागले. पश्चिम बंगाल मधील 'अरबारी' येथे सर्वप्रथम ६०० कुटुंबांचा सहभाग असलेला वनव्यवस्थापनाचा पथदर्शक प्रकल्प सुरू करण्यात आला. तेथेही हाच अनुभव आला. प्रकल्पात सहभागी होणा-या गरीब महिला मोळेकरीचा व्यवसाय करीत होत्या. या व्यवसायापासून परावृत्त करण्यासाठी त्यांना तोपर्यंत मिळत असलेल्या उत्पन्नाची भरपाई करण्यासाठी अन्य पर्यायी साधन निर्माण करून देणे भाग पडले. अशा पर्यायी साधन निर्मितीसाठी सुरूवीतीची काही वर्षे सुमारे एक लाख रूपये दरवर्षी वनखात्याला खर्च करावे लागले होते.

वन संरक्षण करण्याच्या एकमेव दृष्टीकोनातून जळाऊ लाकडाच्या प्रश्नाकडे आत्तापर्यंत सरकारने अजिबात पहिलेले आहे. परंतु शुक्ला यांचे मते मात्र जैविक जळणाच्या प्रश्नापासून भारताची सुटका नाही. सरकारने या प्रश्नाकडे कानाडोळा करण्याची सध्याची प्रवृत्ती सोडून द्यावी आणि जळाऊ लाकडाच्या व्यापाराला वनातील कायदेशीर उद्योग म्हणून मान्यता दयावी. असे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे. संयुक्त वन व्यवस्थापनाच्या कार्यात लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी जळाऊ लाकडाचे आमिष म्हणून सध्या नाही तरी वनखाते वापर करतच आहे. मग हे जाळे आणखी विस्तारता येणार नाही का? तेव्हा अशीच हिंमत दाखवून लाकडाची फाटी या ज्वलनाला पर्यायी साधन शोधून काढण्याची मोहिम वनखात्याने थांबवली पाहिजे. लाकूड फाट्यांच्या कमतरतेला एकमात्र पर्याय म्हणजे लाकडाचे आधिकाआधिक उत्पादन करणे होय. वनखात्याने तसेच सर्वानीच हे जाणले पाहिजे. तसे केले तरच देशातील एकूण एकंदर क्षेत्रापैकी एक तृतीयांश {33%} क्षेत्र वृक्षछायेत करण्याचे भारत सरकारचे स्वप्न साकार करता येईल.

ग्रामीण विकासाचे मर्मस्थानी लाकूड ज्वलन विभाग आहे. आय. आय. एफ. एम. चे भट्टाचार्य यांच्या मते जळाऊ लाकूड गोळा करून त्याचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यामुळे काही प्रश्न निर्माण होतील असे वाटत नाही. उलट ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यामुळे वाढच होईल. त्याचप्रमाणे झारखंडचे रिजनल कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्ट आर. सी. त्रिवेदी यांचे म्हणणे आहे की, जळाऊ लाकडांवर आपण बंदी घातल्याने अप्रत्यक्षपणे वनाचे फार मोठे नुकसान आपण करत असतो. कारण मग लोक वनसंरक्षणाकडे पाठ फिरवतात. वनाधिका-यांपासून दूर पळतात ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधारभूत ठरणारा हा व्यवसाय असल्याने त्याला आम्ही मान्यता दिली पाहिजे. दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमामध्ये जळाऊ लाकडांच्या व्यवसायाचा अंर्तभाव का असू नये? तसे केले तर डोक्यावरून लाकडाचे भारे वाहून नेणा-यांच्या या धंदयाला संघटित स्वरूप प्राप्त होऊ शकेल.

लाकूड ही पुनरूज्जीवीत होणारी शक्ती आहे. जगातील जैविक उर्जा पुनरूज्जीवीत करण्याचा कार्यक्रम राबविणारा, प्रचंड क्षमता असणारा भारत हा महत्वाचा देश आहे. भारतातील प्रचंड लाकडाचा साठा हा या कार्यक्रमाचा आधार आहे. वृक्ष लागवडीचे खूप आणि विविध फायदे

आहेत. जळणाव्यतिरिक्त घरासाठी आणि ग्रामीण उदयोगधंद्यासाठी इमारती लाकडांचा पुरवठा त्यामुळे होतो. त्यामुळे जमिनीची मातीही पुनरूज्जीत होते. सकस होते. भारतात नवीन वृक्ष लागवडीसाठी भरपूर जमीन उपलब्ध आहे. खाजगी तसेच सरकारी जमिनी निकृष्ट वृक्ष लागवडीसाठी निश्चितच पोषक आहेत. वृक्ष लागवड हा दारिद्रय निर्मुलनाचा फलदायी कार्यक्रम ठरू शकतो, भारतात सुमारे २६.७ दशलक्ष हेक्टर निकृष्ट दर्जाच्या जमिनी आहेत. जळाऊ लाकूड शेती हा जर धंदा म्हणून विकसित झाला तर या निकृष्ट जमिनींमध्ये तो निश्चित यशस्वी होऊ शकेल. एवढेच नाही तर प्रचंड क्षमता असलेला हा धंदा व्यापारी क्षेत्रातही तगून राहील. सक्सेना सुचवितात की वृक्ष लागवडीसाठी सार्वजनिक मोकळ्या जागांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा. या लागवडीचे व्यवस्थापन एक तर समाजाने करावे किंवा लाकूड जळणाचा व्यवसाय करणा-या महिलांनी, पुरूषांनी करावे.

दुग्ध विभागाच्या धर्तीवर जळाऊ लाकूड विभाग संघटित करण्यात यावा. गावातील सहकारी संस्थेमार्फत किंवा नव्या सहकारी संस्था स्थापन करून, त्यांच्यामार्फत जळाऊ लाकडांचा व्यापार करण्यात यावा. जळाऊ लाकूड फाट्यांचा माल बाजारात नेण्यासाठी या संस्थांनी कार्य करावे. जळाऊ लाकडांच्या पुरवठ्याचे नियमन या संस्थांनी अशाप्रकारे करावे की जेणेकरून या मालाला चांगला बाजार आणि भाव मिळेल. या मालाचा पुरवठा त्यांनी अशा पध्दतीने करावा की एका क्षेत्रातील जळाऊ लाकडाचा उत्पादित मालाचा पुरवठा अशा अन्य क्षेत्रात करावा की जेथे मागणी जास्त आहे पण पुरवठा कमी आहे.

दिल्ली येथील विज्ञान आणि पर्यावरण केंद्राचे संस्थापक अनिल अगरवाल यांनी असे सूचित केले होते की, अधिकाधिक वृक्ष लागवडीची संधी म्हणून जळाऊ लाकडांच्या मागणीचा विचार केला गेला पाहिजे. त्यांनी असेही मांडले की, ५ ते १० मॅगावॅट वीज निर्मिती प्रकल्पाचा विचार होऊ शकतो. जैविक जळण आधारीत गॅस निर्मितीचा विचारही होऊ शकतो. ग्रामीण भागात वृक्ष लागवडीस, प्रोत्साहन दिले आणि लाकडाचा जळणासाठी अधिकाधिक वापर सुरू झाल्यावर रॉकेल आणि गॅसवर देत असलेले अनुदान कमी करण्याचाही विचार भारत सरकार करू शकते.

भले गंगू किंवा तिच्यासारख्या डोक्यावरून लाकडाची मोळी वाहून नेणा-यांना विस्मृतीचा पडद्याआड ढकलण्याची आज गरज असेल. पण हे कदापिही योग्य नाही. तथापी आकडेमोड आणि अभ्यासातील लाक्षणिकतेने नव्हे तर सन्मानानी जगणारे माणूस म्हणून भविष्यात आम्ही तिची दखल घेणार आहोत का नाही ?

{ डाऊन टू अर्थ, दि. १५ डिसेंबर २००२ च्या अंकातील शी 'वॉकस् इन ऑब्लीव्हीअन' या लाखाच्या आधारे}

❖ ❖ ❖

# सिकल सेल अनेमिया

डॉ.सु. ल. काटे

तांबड्या पेशींमध्ये सदोष हिमोग्लोबीनमुळे उद्भवणारा हा आजार महाराष्ट्रातील सर्वच समाजामध्ये थोड्याफार प्रमाणात आढळतो. त्याचे प्रमाण अनुसूचित जाती जमातीमध्ये दुर्लक्षित न करण्याइतपत जास्त आहे.

सर्वे सन्तु निरामयाः

## सिकल सेल अनेमिया म्हणजे काय?

सिकल सेल अनेमिया हा रक्तातील तांबड्या पेशींमध्ये आढळणा-या दोषामुळे उद्भळणारा आजार आहे. तांबड्या पेशींमधील हिमोग्लोबीन ह्या प्रथिनाच्या अंर्तगत रचनेतील सूक्ष्म बदलामुळे, हा दोष निर्माण झाला आहे. सिकल सेल रूग्णाच्या रक्ताचा नमुना घेऊन रक्तातील तांबड्या पेशीचे सूक्ष्मदर्शक यंत्राखाली निरीक्षण केल्यास, त्या पेशी नेहमीसारख्या गोलाकार न दिसता गवत कापण्याच्या विळ्याच्या (सिकल) आकारासारख्या दिसतात म्हणून त्या पेशींना सिकल सेल असे संबोधले आहे.

तांबड्या पेशीतील ह्या दोषांमुळे त्या पेशी कमकुवत होतात व त्या लवकर फुटतात. ज्या व्यक्तींमध्ये हा आजार आहे त्याला अनेमिया (पांडुरोग) होतो, म्हणून ह्या आजाराला सिकल सेल अनेमिया असे संबोधले आहे आणि सिकल सेल पेशीतील हिमोग्लोबिनला सिकल सेल हिमोग्लोबीन असे संबोधिले गेले.

सिकल सेल अनेमिया या आजारामध्ये अनेमियाच्या लक्षणाबरोबर सर्वसाधारणपणे सौम्य कावीळ, असाह्य सांधेदुखी, प्लीहाच्या आकारात वाढ आणि संसर्गजन्य आजारासाठी प्रतिकारशक्तीची कमतरता ही लक्षणे आढळतात. ह्या लक्षणाबरोबरच शरीरामध्ये ज्या वेळी प्राणवायूचा पुरवठा कमी होतो त्यावेळी तांबड्या पेशीचे गोलाकार आकारामध्ये बदल होण्याची प्रक्रिया सुरू होते व त्यांचा आकार सिकल सेल सारखा होतो.

शरीरामध्ये उद्भवणा-या खालील लक्षणांमध्ये तांबड्या पेशीचे सिकल सेलमध्ये रूपांतराची प्रक्रिया सुरू होते.

१. संसर्गजन्य आजारामुळे आलेल्या तापामध्ये प्राणवायूचा पुरवठा कमी झाल्यामुळे

२. उलट्या जुलाबांमध्ये शरीरातील पाणी कमी झाल्यामुळे

३. अति थंड व अति उष्ण हवामानामुळे

४. अति परिश्रम

सिकल सेल पेशी वेड्या वाकड्या असल्यामुळे त्या अतिसूक्ष्म रक्तवाहिन्यांमध्ये एकमेकांत अडकण्याची शक्यता असते. शरीरामधील ज्या भागातील अतिसूक्ष्म रक्तवाहिन्यांमध्ये सिकल सेल अडकतात त्या भागातील रक्तपुरवठा खंडित होतो आणि त्या भागामध्ये कुठल्याही वेदनाशामक औषधाला दाद न देणा-या वेदना सुरू होतात. ह्या प्रक्रियेला वैद्यकीय भाषेत सिकल सेल क्रायसेस असे म्हणतात. हे लक्षण दुस-या कुठल्याही आजारामध्ये सर्वसाधारणपणे आढळत नाही म्हणून ह्या लक्षणाला सिकल सेल आजाराचे वैशिष्ट्य म्हणता येईल. ह्या लक्षणामध्ये वेळेवर उपचार न झाल्यास रूग्ण दगावण्याची शक्यता असते.

वर नमूद केलेली सर्व लक्षणे सर्वसाधारण वयाच्या तिस-या किंवा चौथ्या वर्षामध्ये आढळून येतात व जसजसे वय वाढत जाते तसे लक्षणाची तीव्रताही वाढत जाते. ह्या दोषामध्ये रोगप्रतिकार शक्ती कमी होते व लहान वयाच्या रूग्णांना संसर्गजन्य आजार (सर्दी, पडसे, खोकला, जुलाब, ताप वगैरे ) लवकर होतात. मोठ्या मुलांमध्ये मोठ्या हाडाच्या टोकाची झीज झाल्यामुळे अपंगत्व येण्याची शक्यता असते. हा आजार आनिवांशिक आहे. बरा न होणारा आहे. आपला आजार बराच होणार नाही ह्या जाणीवेने रूग्ण व मुलाच्या वेदना पाहून पालकामध्ये निराशेची भावना येते. रूग्ण शीरीरीक आजाराबरोबर मानसिक आजारानेही पिडीत होतो.

### सिकल सेल अनेमिया व अनुवांशिकता

सिकल सेल हा आजार अनुवांशिक आहे. शास्त्रज्ञांना हा दोष रंगसूत्राच्या ११ व्या जोडीवर सापडला आहे. अनुवांशिक शास्त्राच्या नियमाप्रमाणे समाजामध्ये हा दोष दोन प्रकारांमध्ये आढळतो. एक कॅरियर ( रंगसूत्राच्या जोडीपैकी एकाच सूत्रावर दोष ) व दुसरा सफरर ( रंगसूत्राच्या दोन्ही जोड्यांवर दोष ). हा दोष स्त्री व पुरूषांमध्ये सारख्या प्रमाणात आढळतो.

सफरर व्यक्तीमध्ये वर नमूद केलेली लक्षणे आढळून येतात व ती व्यक्ती सतत आजारी असल्यामुळे वैद्यकीय देखभाल सतत आवश्यक असते. सफररच्या आजाराला सिकल सेल अनेमिया असे म्हणले जाते. कॅरियर व्यक्तीमध्ये मात्र सर्वसाधारणपणे वर नमूद केलेली लक्षणे आढळून येत नाहील, परंतु कॅरियर व्यक्तीने कॅरियर व्यक्तीबरोबर लग्न केल्यास सफरर मूल होण्याची शक्यता असते. म्हणजेच सिकल सेल अनेमिया (सफरर ) रूग्णाचे आई वडील कॅरियर असतात.

तांबड्या पेशीतील हिमोग्लोबीन ह्या प्रथिनाचे सिकल सेल हिमोग्लोबीन रूपांतर, ह्या प्रक्रियेला अनुवांशिक शास्त्रामध्ये उत्परिवर्तन (म्युटेशन ) असे संबोधिले आहे. ह्या विषयामध्ये काम करण्-या शास्त्रज्ञाच्या मते सिकल सेल दोष असलेल्या आजारापासून संरक्षण मिळते.

### सिकल सेल दोष कसा ओळखतात ?

सिकल सेल आजार हा रक्तदोष असल्यामुळे ह्या आजाराचे निदान प्रयोगशाळेमध्ये रक्ताच्या नमुन्याची तपासणी करून करता येते. रक्त तपासणी सुविधांमुळे सफरर व कॅरियर व्यक्ती शोधता येतात. ज्या भौगोलिक विभागामध्ये सिकल सेलचा प्रसार जास्त आहे तेथे ह्या आजाराचे निदान शक्य तितक्या लवकर झाल्यास पुढील औषध उपचार करणे सोपे जाते.

ज्या ठिकाणी रक्त तपासणी सुविधा उपलब्ध नाहीत तेथे निदान न झाल्यामुळे चुकीचे औषधोपचार दिल्यामुळे रूग्णाचा आजार वाढण्याची शक्यता असते. हा आजार प्रथम आफ्रिकेतील निग्रो आदिवासी जमातीमध्ये आढळला. त्याचे अमेरिकेमध्ये स्थलांतर झाल्यामुळे अमेरिका ह्या देशामध्येही सिकल सेल प्रसार झाला. आपल्यापेक्षा अमेरिकेमध्ये रूग्णांची संख्या कमी असूनही आजाराची तीव्रता विचारात घेऊन तेथे सर्व समाजातील बाळाचे जन्मतःच रूग्णालयात निदान केले जाते. बाळ सिकल सेल आजाराचे आढळल्यास त्याच्या आजाराकडे विशेष लक्ष पुरवले जाते.

### सिकल सेल अनेमियाचा प्रसार

बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे ह्या

संस्थेतील अनुवांशिक गुणदोष विभागाने महाराष्ट्रातील निरनिराळ्या जाती जमातीचे ह्या आजारासंबंधी सर्वेक्षण केले आहे. त्यांच्या पहाणीमध्ये हा आजार प्रामुख्याने आदिवासी, दलित, भटक्या विमुक्त जमाती व इतर मागासलेल्या समाजामध्ये आढळतो. सर्वेक्षणाचे आधारे महाराष्ट्र राज्यामध्ये सिकल सेल कॅरियर व्यक्ती २५ लाखांपेक्षा जास्त व सिकल सेल सफरर व्यक्ती दीड लाखांपेक्षा जास्त असाव्यात असा अंदाज आहे. नंदूरबार जिल्हातील भिल्ल व पावरा आणि गडचिरोली जिल्हातील माडिया, गोंड, परधान व इतर आदिवासी जमातीमध्ये ह्या आजाराचे प्रमाण सगळ्यात जास्त आहे. त्याचप्रमाणे विदर्भातील दलित समाजामध्येही ह्या आजाराचे प्रमाण जास्त आहे. हा आजार प्रामुख्याने मागासलेल्या विभागामध्ये आढळतो. तेथे कमीतकमी रोगनिदान सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**सिकल सेल आजार व उपचार -**

सिकल सेल अनेमिया हा आजार अनिवांशिक असल्यामुळे तो बरा करणारी औषधोपचार पध्दती आज तरी आपल्या देशात उपलब्ध नाही. पाश्चात्य देशामध्ये बोन मॅरो ट्रान्स्प्लांटेशन (बी. एम. टी. ) व जीन थेरेपी उपचार उपलब्ध आहेत. पण ते फारच महागडे आहेत. येथील सामान्य जनतेला परवडणारे नाहीत. आजाराचे निदान झाल्यावर त्याची तीव्रता कमी करणारी औषधे उपलब्ध आहेत. महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर पुणे ही संस्था नंदूरबार जिल्हामध्ये सिकल सेल रूग्णावर आयुर्वेदिक पध्दतीने उपचार करीत आहे. ह्या औषधाने रक्तवृध्दी होऊन अनेमियाचे प्रमाण कमी झाले आहे व वेदनांची तीव्रता कमी झाली आहे त्यामुळे रूग्ण आणि पालक यांचा प्रतिसाद चांगला आहे.

**प्रतिबंधक उपाययोजना -**

महाराष्ट्रातील मागासलेल्या भौगोलिक विभागामध्ये सिकल सेल दोष मोठ्या प्रमाणावर आहे, त्यामुळे ह्या आजाराबद्दल गैरसमज जास्त आहेत. त्याचे एक बोलके उदाहरण म्हणजे ज्या व्यक्तीला पूर्वजांनी मोठ्या जनावराचे मांस खाल्ले त्या कुटुंबातच हा आजार होतो असा गैरसमज आहे, ह्या सर्व बाबींचा विचार करुन ह्या आजाराबाबत प्रथम जनजागरण होणे आवश्यक आहे. हा आजार संसर्गजन्य नाही, त्यामुळे त्यासाठी प्रतिबंधक लसही तयार करता येत नाही, ह्या आजारासाठी औषधच नाही मग ह्या आजाराला प्रतिबंध करता येईल का हा विचार पुढे आला. त्यामध्ये सिकल सेल आजाराचे मूल जन्मालाच येऊ न देणे या बाबीला महत्व दिले गेले. कॅरियर व्यक्तीने कॅरियर व्यक्तीबरोबरच लग्न केल्यास सफरर बेबी होण्याची शक्यता असते. म्हणजेच अशा त-हेने लग्नपध्दतीला प्रतिबंध केल्यास सफरर बेबी जन्माला येणारच नाही व पर्यायाने पुढील अनर्थ टळून ह्या आजाराला आळा बसेल. जगामध्ये सायप्रस नावाच्या छोट्या देशाने सिकल सेल सारख्याच रक्तातील अनुवंशिक दोष थॅलेसेमिया ह्या आजारावर नमूद केलेली प्रतिबंधात्मक उपाय योजना योजून आनुवांशिक आजारावर मात केली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे-

**पहिला टप्पा -**

सायप्रस देशाची लोकसंख्या अंदाजे सात लाख आहे. त्या देशामध्ये दरवर्षी थॅलेसेमिया आजाराची १०० बालके जन्म घेत होती. त्यामुळे दरवर्षी थॅलेसेमिया रूग्णाची संख्या वाढतच होती. थॅलेसेमिया हा रक्तामधील दोष असल्यामुळे रक्त तपासणी करून त्याचे निदान करता

येते. प्रतिबंधक उपायांच्या पहिल्या टप्पामध्ये देशातील सर्व व्यक्तींची रक्त तपासणी करून प्रत्येकाला ओळखपत्रे दिली गेली. त्या ओळखपत्रामध्ये ती व्यक्ती सफरर, कॅरियर किंवा दोष नसलेली आहे (नॉर्मल) ह्याची पूर्ण माहिती दिली गेली.

दुसरा टप्पा -

तो देश ख्रिश्चन धर्मीय असल्यामुळे लग्न ठरवलेली जोडी लग्न करण्यापूर्वी चर्च प्रमुखांकडे परवानगीसाठी अर्ज करायला जात असे. त्यावेळी चर्चप्रमुख त्यांचेजवळची थॅलेसेमिया सेंटरची ओळखपत्रे वाचून ते दोघे कॅरियर असतील तर लग्न न करण्याचा सल्ला देत असत. सर्वसाधारणपणे ६० % जोडपी चर्चचा सल्ला योग्य आहे असे पटल्यावर दुसरा जोडीदार शोधण्याचा प्रयत्न करीत होते. ४०% जोडपी चर्चचा सल्ला न मानता लग्न करीत होते.

तिसरा टप्पा -

वर नमूद केलेल्या ४०% जोडप्यांतील स्त्री ज्या ज्या वेळी गर्भवती राहिल त्यावेळी पहिल्या तीन महिन्यांमध्ये त्या स्त्रीने थॅलेसेमिया सेंटरला भेट देणे बंधनकारक ठेवले होते. पहिल्या तीन महिन्यांमध्ये पोटातील बाळाचा रक्तनमुना घेऊन थॅलेसेमिया आजारासंबंधी निदान करून ते बाळ थॅलेसेमिया आजाराचे आहे. असे आढळून आल्यास गर्भपात बंधनकारक होता. १९७६ साली त्यांनी ही उपाययोजना सुरू केली व ७ वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर १९८३ साली थॅलेसेमिया आजाराचे एकही बाळ जन्माला येऊ दिले नाही. ही पध्दत कमी खर्चाची व प्रदीर्घ आरोग्य शिक्षणाच्या माध्यमाने त्या देशाने साध्य केली.

आपल्या देशामध्ये सिकल सेल आजारासाठी आरोग्य शिक्षणाच्या माध्यमाने वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ मंडळींच्या मार्गदर्शनाने, समाजसेवक, शिक्षक, विद्यार्थी आणि समाजातील तरूण मंडळी एकत्र येऊन प्रयत्न केल्यास आपणही हे करू शकू. अवघड आहे पण अशक्य नाही.

आपल्या देशामध्ये तसा प्रयोग आय. सी. एम. आर. या संस्थेने नंदूरबार व गडचिरोली जिल्हातील काही निवडक गावांमध्ये केला आहे. गावातील प्रत्येक व्यक्तीचे रक्त तपासून, तपासणी आधारे कार्ड वाटप करून आरोग्य समस्यांसंबंधी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सफरर व्यक्तीसाठी औषधउपचारांची सोय केली होती. हा कार्यक्रम आता महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे या संस्थेने पुढे चालू ठेवला आहे. ह्या कार्यक्रमाबद्दल आमचा अनुभव खालीलप्रमाणे :-

१. जनजागृतीच्या कार्यक्रमाला योग्य प्रतिसाद मिळाला.

२. कार्ड वाटपाचे बाबत मिश्र प्रतिक्रिया. तरूण पुढे आले. मात्र लग्न जमविण्यामध्ये अडचणी येतील या भीतीने तरूणांनी पुढाकार घेतला नाही.

३. सिकल सेल रूग्णाच्या पालकाकडून उत्तम प्रतिसाद, जनजागरण मोहिमेमध्ये पुढाकार.

४. सिकल सेल रूग्णाकडे रोगनिदानाचे कार्ड असल्यामुळे रूग्णालयामध्ये त्वरीत आणि योग्य उपचार केले गेले.

❖❖❖

# महिलांचे स्वयं-सहाय्य बचत गट

ग.शां. पंडित

सर्व किंवा काही बाबतीत समानता असणाऱ्या, १० ते २० जणींचा, स्वेच्छेने व बाबतीच्या निमित्ताने एकत्र आलेला समूह म्हणजे 'स्वयंसहाय्य बचत गट' असे म्हणता येईल. याला स्वयंसहायता गट, समूह अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते.

**स्वयं - सहाय्य गटाची वैशिष्ट्ये :**

अनेकदा अनेक प्रश्न केवळ एकट्याच्या जीवावर, एकट्याच्या प्रयत्नातून सोडवता येत नाहीत. पण अनेकजण तो प्रश्न सोडवायला एकत्र आले तर तो प्रश्न चुटकीसरशी सुटतो.

समान विचारांनी व समान उद्दिष्टांनी, म्हणजे एखादे विशिष्ट काम करू इच्छिणाऱ्या व्यक्ती एकत्र आल्या तर ते काम समूहाच्या म्हणजे गटाच्या पातळीवर करता येते. जर गटाचे महत्व त्याच्या नीट लक्षात आले,तर अशीच त्यातरही कामे करता येतील, यातूनच कायमस्वरूपी 'स्वयं-सहाय्य' गटांची स्थापना होते.

**बचत गटाचे उद्देश :**

१. बचत गटाच्या सभासदांमध्ये काटकसर व बचतीची सवय विकसित करणे.

२. सभासदांची बचत व बँकेचे कर्ज या माध्यमातून गटाचा स्वयं- विकास निधी निर्माण करणे.

३. सभासदांच्या दैनंदिन गरजा तसेच उत्पादनक्षम उपक्रमांसाठी अंतर्गत कर्ज पुरवठा करणे.

४. सभासदांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देऊन स्वयं-सहाय्य गटाची उत्पादन क्षमता वाढविणे.

५. सभासदांमध्ये सहकार्याची व एकीची भावना वाढीस लागावी यासाठी सामाजिक, सांस्कृतिक व इतर उपक्रमांचे आयोजन करून त्यात सभासदांचा सहभाग वाढविणे.

६. शासनाच्या निरनिराळ्या विकास योजनांची माहिती सभासदांना करून देणे व त्यांचा लाभ मिळविण्याचा प्रयत्न करणे.

७. गटातील सभासदांच्या वैयक्तिक व सामाजिक स्वरूपाच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

८. बचत गटाचा सर्वांगीण विकास साधणे.

**बचत गटाची वैशिष्ट्ये :**

अशा स्वयं -सहाय्य गटांची वैशिष्ट्ये आपण समजून घेऊ या.

**(अ)समान गरजा :**

गटाचे सर्व सभासद मिळून एकाच विचारांचा वा एकाच अडचणीतून मार्ग काढू इच्छिणाऱ्या सभासदांचा बनतो, थोडा विचार केला तर आपले आपल्यालाच जाणवेल की, गरीबी अथवा हलाखीची परिस्थिती यावर मात करू इच्छिणारे सभासद एकत्र येतात, तेव्हाच कायमस्वरूपी स्वयं-सहाय्य गट बनतो. म्हणजे या एकत्र येणाऱ्यांच्या गरजा एकसारख्याच असतात.

**(ब)सभासदांची परिस्थिती सारखीच असते :**

तुमच्या लक्षात येईल की, यातील सभासद साधारणतः एकाच आर्थिक आणि सामाजिक स्तरातील असतात. एक फार श्रीमंत आणि एक फार गरीब अशी अवस्था नसते. याचे कारणही अगदी उघडच आहे. एक झोपडीत राहणारी आणि दुसरी चौसोपी वाड्यात राहणारी असेल तर मुळात त्यांचे एकमेकांशी जवळचे संबंध येणारच नाहीत आणि अशा महिला एकाच उद्दिष्टासाठी कधी एकत्रही येणार नाहीत.

**(क) सभासदांचा परस्परांबद्दल जिव्हाळा :**

सभासदांना परस्परांबद्दल जिव्हाळा असतो, आपुलकी असते, जवळीक वाटते आणि ही गोष्टसुध्दा अगदी स्वाभाविकच आहे. कारण मुळात हे सारे सभासद एकाच समान विचाराने एकत्र आलेले असतात. शिवाय ही एकत्र येण्याची प्रक्रियाही काही एका दिवसात पूर्ण झालेली नसते. बहुतेक सारे सभासद एकाच भागातील असतात. एकमेकांना आधीपासून ओळखताही असतात. म्हणूनच त्यांचे संबंधही एकाच कुटुंबातील सदस्यांसारखे एकमेकांना सांभाळून घेणारे, एकमेकांची काळजी घेणारे, जीवाला जीव लावणारे असतात. तिथे केवळ आर्थिक देवाण-घेवाण नसते. एकमेकांची सुख-दुःख वाटून घेण्याचा एकाच्या अंगावरील बोजा सर्वांनी मिळून वाटून घ्यायचा हा प्रयत्न असतो.

**(ड) सभासद संख्या :**

स्वयं-सहाय्य गटाची सभासद संख्या २० पेक्षा कमी असते. गटाची संख्या २० पेक्षा जास्त झाल्यास त्या गटाची नोंदणी करावी लागते, म्हणून २० पेक्षा कमी सभासद असल्याने सर्वांच्या विचाराने संघटित प्रयत्न करणे शक्य होते.

**(इ) स्वनिर्मित नियमावली :**

गटाने नियमावली स्वतः तयार केलेली असते. गटाचे कामकाज नीट चालावे, यादृष्टीने हे नियम गटाचे सर्व सभासद मिळून तयार करतात. नियमासाठी नियम नसून ते सभासदांसाठी नियम असतात, त्यामळे लवचिकता असते.

**(फ) संघटित निर्णय व कृती :**

गटाला अध्यक्ष, सचिव व खजिनदार असे पदाधिकारी किंवा संघटिका, सहसंघटिका असतात पण पदाधिकारी गटाचे कोणतेही निर्णय गटावर लादत नाहीत. किंबहूना सभासद व पदाधिकारी मिळूनच सर्व निर्णय घेतात. सर्वांनी मिळून निर्णय घेतल्याने त्या निर्णयाप्रमाणे कृती सर्व सभासदांनी मिळून करणे गरजेचे वाटते.

**(ग) कारभारात पारदर्शकता :**

सामाजिक, आर्थिक यांसारख्या क्षेत्रात काम करत असल्याने त्यांच्या सभांच्या व आर्थिक व्यवहारांच्या नोंदी ठेवल्या जातात व त्या सर्व नोंदी सभासदांसमोर केल्या जातात. स्वयं-सहाय्य गटाचा कोणताही सभासद या नोंदी तपासून पाहू शकतो. त्यामुळे गटाच्या कारभारात पारदर्शकता असते.

**स्वयंसहाय्य गटाचे फायदे :**

स्वयंसहाय्य बचत गट चालविण्यामागे नेमके काय फायदे आहेत, हे जाणून घेणेही महत्त्वाचे आहे.

***व्यक्तिगत फायदे :***

**१. जन्मजात गुणांचा विकास :**

जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही उपजत गुण असतात. या गुणांना योग्य वेळी संधी मिळाली नाही तर विकास खुंटण्याची शक्यता असते. स्वयं-सहाय्य गटात आल्याने महिलांना त्यांच्या उपजत / जन्मजात गुणांचा

विकास करण्याची संधी मिळते. इतरांच्या संगतीत सद्गुणांचा विकास झाला तर त्या व्यक्तीच्या जीवनात अनुकूल बदल होतो.

**२. कर्तृत्वाला दिशा / वाव मिळतो**

बरेचदा कौटुंबिक, सामाजिक व धार्मिक बंधनांमुळे स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव मिळत नाही. म्हणून प्रत्येकीला तिच्या अंगातील गुणांची वाढ व जोपासना कशी करावी, हे कळण्यासाठी स्वयं-सहाय्य गटात शिकण्याची संधी मिळते. गट सदस्यांची कर्तबगारी विकसित होते.

**३. व्यक्तिमत्वाचा विकास**

स्वयंसहाय्य गटात सहभागी झालेल्या महिलेचे व्यक्तिमत्व विविध अंगांनी विकसित होते. उदाहरणार्थ, सभेत बोलण्याचा धीटपणा येतो, घराबाहेर पडून स्वावलंबी जीवन जगता येते, इतरांना शिकविण्याइतपत विकास करता येतो.

**४ कुटुंबातील स्थान उंचावणे**

स्वयंसहाय्य गटात आल्यापासून पैशाचा वापर कुठे आणि कसा करायचा? त्यातूनही बचत कशी करायची? हे निर्णय ती स्वतः घेऊ शकते. आता ती निर्भयपणे हा निर्णय बरोबर आहे, हे पटवून देऊ शकते व गट तिच्या पाठीशी आहे, याचा घरातील लोकांवर परिणाम होतो. घरात, समाजात तिच्या शब्दाला किंमत येते.

***सामाजिक फायदे :***

**१. स्त्री-पुरूष समानता**

महिला असो वा पुरूष, त्यांना कुटुंब आणि समाजात समान दर्जा देणे, आर्थिक बाबतीत, सामाजिक बाबतीत व कायद्याच्या दृष्टीने तिला समान हक्क देणे याला स्त्री-पुरूष समानता म्हणतात. स्वयंसहाय्य गटामुळे गटाचे सभासद जबाबदारीने घराबाहेरील कामे निर्भिडपणे करू लागल्यावर पुरूषांनाही त्याची जाणीव झाली. महिला अर्थार्जन करू लागल्यावर सहाजिकच समानतेचे वारे वाहू लागतात.

**२. मानसिक आधार :**

सभासदांच्या जशा वैयक्तिक वा कौटुंबिक समस्या असतात, तशाच काही सामाजिक समस्या ही असतातच. त्यांची चर्चा गटात करता येते व त्यामुळे तिचे मनही मोकळे होते.

अशा प्रकारच्या सर्व समस्यांवर मार्ग शोधण्याचे प्रयत्न गटातील सर्व सभासद चर्चा करून त्यातून उपाय योजना शोधतात व स्वतः त्याचा पाठपुरावा करतात.

**३. व्यक्तिमत्व विकास व नेतृत्व गुणात वाढ**

स्व-सामर्थ्याच्या जाणीवेतून आत्मविश्वास वाढल्याने गटातील महिला अधिक मोकळेपणाने कुटुंबात व समाजात वावरताना आढळतात. त्या अधिक धीटपणे आपले म्हणणे गटाच्या बैठकीत मांडतात, तसेच वेळ प्रसंगी बँकेच्या तसेच सरकारी अधिकाऱ्यांकडे वा लोकप्रतिनिधींकडे आपल्या कामासंबंधी आग्रहपूर्वक म्हणणे मांडतात.

**४. व्यवस्थापन कौशल्य व समस्या निराकरणाचे मार्ग**

गट चालविण्यासाठी लागणारे व्यवस्थापन कौशल्य, हिशेब ठेवावयाचे ज्ञान व विविध समस्यांतून मार्ग काढण्याचे बौध्दिक सामर्थ्य यांबरोबरच व्यवहारज्ञान परिपक्वता व संघटन कौशल्य, संभाषण कौशल्य ही सारी गुणवैशिष्ट्ये उत्तम दर्जाचे नेतृत्व गुण आहेत. केवळ गटासारखे आत्मप्रकटनाचे माध्यम मिळाल्यामुळे महिलांमधील या सुप्त गुणांना वाव मिळाला आहे, हे नाकारता येत नाही.

***आर्थिक फायदे :***

स्वयं - सहाय्य गटामुळे होणारे आर्थिक फायदे हे सभासदाचे वैयक्तिक फायदे सुध्दा आहेतच, किंबहूना त्यावरच सामाजिक फायदेही अवलंबून असतात.

आर्थिक फायद्यांचा विचार करताना त्यात पुढील गोष्टी नमूद केल्या जातील.

**१. बचतीला सुरक्षितता :**

गटाच्या अगदी सुरूवातीपासून होणारा फायदा म्हणजे सभासदांना नियमीत बचतीची चांगली सवय लागते. गटात केलेल्या बचतींना सुरक्षितता मिळते. सभासदांना आर्थिक साह्य देण्याइतकी बचतीची रक्कम गटात जमा झाली की, त्यातून सभासदांना पुढील कारणांसाठी आर्थिक साह्य दिले जाते. आजारपण, बाळंतपण, लग्नकार्य, कापड खरेदी, शाळकरी मुलांच्या शिक्षणाची फी, धान्य खरेदी, इत्यादी.......

**२. कर्ज पुरवठ्याची सोय**

वरील कारणांसाठी स्वयंसहाय्य गटात कर्ज मिळते. त्या कारणांसाठी कोणतीही वित्तसंस्था कर्ज देत नाही. त्यांच्याकडे तारण ठेवायलाही काही नसल्याने बँकेकडून कर्ज मिळण्याची शक्यताच नसते. अशा वेळी गटाच्या माध्यमातून कर्ज मिळाल्याने जीवनमान सुधारू शकते. याचा आणखी एक फायदा असा होतो की त्यामुळे कुटुंबातील परस्परांची जबाबदारी विभागली जाऊन नात्यागोत्यातली अनुकूल बदल होण्याची शक्यता असते.

**३. गरजेच्या वेळी आर्थिक साह्य**

स्वयंसहाय्य गटात कागदपत्रांच्या त्रासाशिवाय, विनातारण, केवळ सहसभासदाच्या हमीवर लगेचच मिळणारे हे कर्ज मग भले त्याचा दर जरी बँकेच्या दरापेक्षा जास्त असला तरी गरजू सभासदांना कर्ज मिळाल्याने खरोखर आर्थिक सहाय्यच वाटते. ऐन गरजेच्या वेळी गटाकडून मिळणारे हे आर्थिक साह्यही महिलांच्या दृष्टीतून केवळ सोय नसून सावकारी व्याजाचा दर लक्षात घेता ही फारच फायद्याची बाब आहे.

**४. राजकीय नेतृत्व**

गटाचे नेतृत्व करता करता समाजाचे नेतृत्व करणे व याबरोबरच राजकीय नेतृत्वात सहभाग मिळविणे हे गटागटांतून दिसू लागले आहे. भारतीय राज्यघटनेने महिलांना समान हक्क दिले आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी महिलांना ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद व नगरपालिकांमध्ये ३०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.कोणाची तरी आई, बहिण, पत्नी यापेक्षा आमची क्षमता, आमचे कौशल्य आणि स्त्रियांचा व गावक-यांचा पाठिंबा या मुळे निवडणुकीत गटात सभासद म्हणून निवडून येते हे कधीही प्रतिष्ठेचे व अभिमानास्पद आहे.

**बचत गटाचा निधी व मालमत्ता**

सदर निधी व मालमत्ता गटाचे नावाने राहील.

स्वयं - सहाय्य गटाचा निधी व मालमत्ता उभारणीचे मार्ग पुढीलप्रमाणे आहेत :-

१. सभासदांची मासिक बचत.
२. शासनाकडून किंवा बँकेकडून मिळालेल्या फिरता निधी
३. शासनाकडून मिळालेले अनुदान
४. सभासदाने किंवा एखाद्या दात्याने दिलेले दान उदा. जमीन इ.

**१. सभासदाची मासिक बचत**

प्रत्येक सभासदाने दर महिन्याला कमीत कमी ३० रूपये, ५० रूपये अथवा १०० रूपये समान बचत करावी. ही मासिक बचत सतत चालू ठेवावी लागेल, त्यात केव्हाही खंड पडू देऊ नये.

आवश्यकता असेल तेव्हा सभेचा ठराव घेऊन बँकेतून जमा रकमेतून पैसे काढता येतील; परंतु बँकेमध्ये किमान रक्कम शिल्लक असली पाहिजे.

सभासदाने आपली मासिक बचत कौटुंबिक उत्पन्नातून करावी व तीच गटात भरावी. व्याजाने काढलेली रक्कम गटात भरू नये.

सभासदाच्या दरमहा बचत रकमेवर महिन्याअखेर व्याज मिळणार नाही. वार्षिक हिशेबानंतर व्याजाची वाटणी करण्यात येईल.

एखाद्या सभासदाने स्वतः ची रक्कम स्वयंसहाय्य गटाला कायम ठेव म्हणून दिली तर त्यावर स्वयं-सहाय्य गट ठरवेल त्याप्रमाणे वार्षिक दराने व्याज सभासदाला देण्यात येईल.

स्वयं-सहाय्य गटाचा कोणताही सभासद थकबाकीदार झाला तर प्रत्येक सभासदाने थकीत रकमेच्या वसुलीसाठी सहकार्य देणे आवश्यक आहे. ती प्रत्येकाची जबाबदारी राहील.

## २. फिरता निधी

स्वयं-सहाय्य गटाला बँकेकडून / शासनाकडून मिळालेला फिरता निधी पुढील कारणांसाठी वापरता येईल.

सभासदांना व्यवसाय अथवा उत्पादनक्षम कार्यासाठी अंतर्गत कर्जवाटप करणे. उदाहरणार्थ, कच्च्या मालासाठी, मार्केटिंगसाठी इत्यादी.

सदर अंतर्गत कर्जवाटपासाठी घेतलेली रक्कम विहीत वेळेत (दिलेल्या मुदतीत) बँकेच्या खात्यात जमा करावी.

एका गटाच्या अंतर्गत कर्जवाटप होऊनही रक्कम शिल्लक राहिली तर अन्य गटाला ती कर्जाऊ दिली जाईल. मात्र सदरची रक्कम घेणा-या गटाला कर्ज देणा-या गटाच्या अटी बंधनकारक राहतील.

दारिद्रय रेषेखालील गटाला शासनाकडून अनुदान दिले जाते. ती रक्कम गटाचा निधी असतो.

काही व्यक्ती / संस्थानी गटाला देणगी म्हणून काही रक्कम दिली तर ती गटाची मालमत्ता असू शकते.

गटाबाबत सभासद नाराज होऊन गट सोडून जाण्याची ठळकपणे उठून दिसणारी काही कारणे

### अ. हिशोबातील गोंधळ :-

दरमहिन्याच्या बैठकीमध्येच वेळच्यावेळी हिशेब लिहिले नाहीत तर जुळत नाहीत. अशा वेळी कागदावरील रक्कम व हातातील रक्कम यांत फरक दिसतो व पदाधिकारी काहीतरी गडबड करीत आहेत, असा संशय निर्माण होतो.

### ब. पारदर्शकपणाचा अभाव :-

गटातले सर्व व्यवहार सर्वांसमोर झाले नाहीत अथवा हिशेबाचे कागद सर्वांसाठी खुले ठेवले नाहीत तर आपल्याला अंधारात ठेवून पदाधिकारी काहीतरी व्यवहार करतात, अशी भावना निर्माण होते. गटात संशयाचे वातावरण तयार होते.

### क. गटबाजी :-

गटामध्ये छोटे छोटे गट तयार होणे, हेही गट फुटण्याचे एक कारण ठरू शकते. असे गट लगेचच उठून दिसतात. अशा पोटगटातील सभासद नेहमीच एकदम येतात. एकदम जातात. बैठकीतही ते एकमेकांच्या शेजारच्या जागा पटकावयाला बघतात. चर्चेत आपल्या उपगटातील सदस्यांचे म्हणणे चुकीचे असले तरी त्याचा पाठपुरावा करतात.

### ड. असमान वागणूक :-

वर्व सभासदांना समान वागणूक न मिळता, काहीजणांबाहत झुकते माप देणारी पदाधिका-यांची पक्षपाती वागणूक गट फुटण्यास कारणीभूत ठरते.

**इ. निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी न मिळणे :-**

गटासंबंधित सर्व महत्त्वाचे निर्णय पदाधिकारी व काही मोजकेच सभासद घेत असतील तर इतरांना गटाचा निर्णय किंवा गट आपला वाटत नाही व सभासद गट सोडून जाण्याची शक्यता असते.

**फ. सभासदाचा मृत्यु :-**

गटातील एखाद्या सभासदाचा मृत्यु झाल्यास गट अडचणीत येण्याची शक्यता असते. अडचणीत येणे या अर्थाने की, जर मृत्यु पावणाऱ्या सभासदाने जास्त रकमेचे कर्ज घेतलेले असेल तर त्यामुळे बचतीचा मोठा हिस्सा विनाकारण अडकण्याची शक्यता असते. त्यामुळे गटाची आर्थिक कोंडी होऊ शकते.

वरील सर्व गोष्टींसंदर्भात काय काय उपाययोजना केल्या जातात, याची महिती आपण आता पुढे घेणार आहोतच.

*उपाययोजना*

**१. गटबाजी तयार होऊ देऊ नये :-**

पोटगटांची गटबाजी तयार होऊ नये, याची आधीपासून काळजी घ्यावी. सारे कामकाज एकमताने चालावे. सर्वांचे मत विचारात घेऊन मगच आपण निर्णय घ्यावा. गटाच्या प्रत्येक कामकाजात आणि चर्चेत भाग घेण्याची प्रत्येक सभासदाला संधी असावी, आपले स्वतःचे मत मांडायची संधी असावी, यालाच सभासदांनी निर्णय-प्रक्रियेत सहभागी होणे असे म्हणतात.

**२. सभासदांच्या हजेरीचा आणि सहभागाचा आग्रह असावा :-**

महिलांची निर्णयक्षमता वाढावी असे वाटत असेल तर सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक सभासदाने प्रत्येक बैठकीला वेळेवर आणि पूर्णवेळ हजर असलेच पाहिचे, असा नियम असावा. नियम कसोशीने पाळला जावा, यासाठी उशिरा येणे, लवकर जाणे, गैरहजर राहणे, अशा नियमभंगाबद्दल दंडाची तरतूद असावी. दंड म्हणून रोख रक्कम घेतली तर गटाचे उत्पन्नही वाढते. परंतु दंड रोख रकमेचाच असावा, असेही नाही.

**३. सातत्याने प्रबोधन चालू ठेवावे:-**

स्वयंसहाय्य गट म्हणजे केवळ सभासदांचे बचतीचे पैसे जमा करून कर्ज म्हणून वाटणारी व्यवस्था नव्हे, महिला मंडणाची बैठक किंवा भिशी नव्हे, हे संघटिकेने आधिच स्पष्ट करावे. बचतीचे पैसे दुसरीच्या हाती पाठवून द्यायचे आणि केवळ कर्जवाटपाच्या वेळी हजर रहायचे. उशिरा यायचे किंवा लवकर जायचे, बैठकीत मांडलेल्या विषयांवर काहीच न बोलता, दुसरी कोणीतरी सांगते म्हणून आपणही तिच्या 'हा' ला 'हो' म्हणायचे, दुसरी कोणीतरी सांगते म्हणून केवळ हात वर करून मत द्यायचे, हे सभासद निर्णयप्रक्रियेत सहभागी असल्याचे किंवा गट चांगला चालल्याचे लक्षण नव्हे, याची सभासदांना जाणीव करून द्यावी.

**४. भेदभाव नसावा :-**

सर्व सभासदांनी आपले म्हणणे मोकळेपणाने मांडावे, असे वाटत असेल तर जसे गटाबाहेरच्या माणसांना दूर ठेवायला हवे. तसेच गटातले वातावरणही निकोप राखायला हवे. सर्वांना समान संधी आणि समान वागणूक मिळेल याबाबत सर्वांनीच डोळ्यात तेल घालून जागरूक असले पाहिजे. सर्वांसाठी समान वागणूक

हे फार मोठे जीवनमूल्य आहे.

हे कसे जमेल ?

एकमेकांचे उणेदुणे काढायचे नसतेः पहिली गोष्ट म्हणजे एकीने एखादी सूचना केली आणि दुसरीला ती सूचना खोडून काढायची असली तरी तिने बोलताना केवळ त्या सूचनेच्या अंमलबजावणीने होणा-या फायद्या-तोट्याविषयीच बोलायचे असते. सभासदानी एकमेकांचे उणेदुणे काढायचे नसते, हे गटाच्या अध्यक्षाने सर्वांना वेळोवेळी सांगावे.

**कोणाचाही आवाज दाबू नये.**

अमूक एक महिला उपाय सांगण्याला विरोध करेल म्हणून तिला बोलायला संधीच द्यायची नाही, असे होता कामा नये. तसे केले की, ज्यांना ज्यांना बोलायला संधी मिळाली नाही, त्यांच्या मनात असंतोष निर्माण होतो. आपल्याला बोलायची संधी न देणा-या अध्यक्षांबद्दल वाइटारांबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण होते. त्यातूनच पुढे वादावादी वा गटबाजी निर्माण होते.

**पारदर्शकता**

सर्व व्यवहार सर्वांच्या समक्ष करणे आणि सर्व नोंदी सर्वांच्या समक्षच लेखी पूर्ण करणे, हे सर्वांचा विश्वास मिळविण्याचे सर्वात सोपे आणि एकमेव साधन आहे. कोणताही निर्णय घेताना निर्णयप्रक्रियेत सर्वांना सामील करून घेतले आणि गटात झालेले आर्थिक व्यवहार गटाच्या बैठकीतच पूर्ण केले, त्यांची लेखी नोंद बैठकीतच सभासदांच्या पासबुकात लगेचच करून दिली, गटाच्या हिशोबाची कागदपत्रे व रजिस्टर्स बैठकीतच लिहून त्यावर सर्वांसमक्ष अध्यक्ष, खाजिनदार आणि सचिवाच्या सह्या झाल्या, तर कोणालाही बोट दाखवायला जागाच राहणार नाही.

**लोकशाही पध्दतीने कामकाज**

प्रत्येकाला मनही असते आणि प्रत्येकाला मतही असते, हे कायम लक्षात ठेवावे. त्यांमुळे गटातल्या प्रत्येक व्यवहाराबद्दल गटात आधी मोकळेपणे चर्चा व्हावी. मगच शक्यतो एकमताने निर्णय घ्यावा. प्रत्येक सभासदाला एकच मत असावे. कोणालाही जादा मताचा आधिकार नसावा. सर्वांसाठी एकच निर्णय असावा. त्यातून कोणालाही सूट नसावी. तालेवार सभासदांना सर्व नियमांतून सूट आणि गरीब सभासदांना मात्र नियमांचा जाच असे नसावे.

**सभासदांच्या मृत्युनेतर घ्यावयाची दखल**

अशा परिस्थितीत दोनही बाजूंनी विचार केला जातो. एक तर मृत्यु पावणा-या सभासदाला दिलेले कर्ज हे आर्थिक व्यवहारातून कमी / वजा करणे, सभासदाच्या कुटुंबातील दुसरी व्यक्ती सभासद म्हणून सभासदत्व पत्करण्यास तयार असल्यास तिला सभासदत्व देता येते. ते कर्ज कोणत्या कारणासाठी दिले गेले आहे, यावरून कर्जाची रक्कम सोडून देण्याची तीव्रता ठरते. तसेच दुसरा उपाय म्हणजे मृत्यु पावणा-या सभासदाने घेतलेल्या कर्जाचा काही भाग सोडून दिला जातो / माफ केला जातो. म्हणजे नवीन येणा-या सभासदाला त्याची तीव्रता जाणवू दिली जात नाही किंवा त्याची त्यावेळेची भावनिक व मानसिक परिस्थिती विचारात घेतली गेल्यामुळे सभासदत्व पत्करण्याचे तेवढे दडपणही त्या नव्या सभासदावर राहत नाही.

❖❖❖

# बचतगटाचे बँक खाते उघडण्यासाठी अर्ज

__________ ग्रामीण महिला बचत गट
मौजे __________ ता. __________
जि. __________
दिनांक

प्रति,
मा. शाखा अधिकारी
__________
शाखा __________

**विषय : बचत गटाचे खाते उघडण्याबाबत**

**संदर्भ :** १. भारतीय रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. डीबीओडी/बीसी/६३/१३:०१/०८/९२-९३ दि.१जानेवारी १९९३.

२. नाबार्ड पत्रक क्र. आयसीडी/६७४४/एसएचके/०१/९२-९३ दि. १३ मार्च १९९३.

महोदय,

वरील विषयानुसार आम्ही खालील सह्या करणा-या __________ ग्रामीण महिला बचत गट, मौजे __________ च्या सभासद असून आम्हाला आमच्या बचत गटाचे बँक खाते आपल्या शाखेत उघडायचे आहे. त्यासाठी लागणारा ठराव आम्ही सोबत जोडलेला आहे. प्रांरभी रूपये /- भरून आमच्या या हचत गटाचे बँक खाते उघडण्यात यावे, ही नम्र विनंती.

आपल्या नम्र,

१. __________ अध्यक्ष
२. __________ सचिव
३. __________ खजिनदार

# बचत गटाचे बँक खाते उघडण्याकरिता ठराव

दि. / / २०० रोजी झालेल्या मासिक बैठकीत मौजे ________ येथील ________ ग्रामीण महिला बचत गटाची स्थापना करण्यात आली. या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आले.

ठराव क्र. दि.

**विषय :** *बचतगटाचे बँक खाते उघडणे व हाताळणे*

बचत गटाची ही सभा सर्वानुमते खालील ठराव मंजुर करते.

गटाचे बँक खाते' ' ग्रामीण महिला बचत गट' या नावाने उघडण्यात यावे

हे खाते चालू / सेव्हिंग्ज / मुदत खाते असावे.

हे खाते संयुख्त खाते असावे.

खाते हाताळण्याकरता पुढील तीन जणींची प्रतिनिधी म्हणून हीच सभा निवड करते आहे. खाते तिघींच्या नावे संयुक्त असले तरी कोणाही दोघींच्या सहीने बँकेचे आर्थिक व्यवहार चालू राहतील, तसे आधिकारी हा ठरावाव्दारे देण्यात येत आहेत.

| **क्र.** | **नाव** | **पद** | **सह्यांचे नमुने** |
|---|---|---|---|
| १. | ________ | अध्यक्ष | |
| २. | ________ | सचिव | |
| ३. | ________ | खजिनदार | |

सूचकः ________ अनुमोदकः ________

सभासदांची नावे व सह्या खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | नाव | सही |
|---|---|---|
| १. | ________ | |
| २. | ________ | |
| ३. | ________ | |
| ४. | ________ | |
| ५. | ________ | |
| ६. | ________ | |
| ७. | ________ | |

# पर्यटन

मॉंगीलाल राठोड

पर्यटनच्या फेब्रीकेटेड मचांगवरून
त्यांना आढळली
आदिवासींची गवती वस्ती
इंग्लिश घेरीत ते
हळूच उतरले दुधीया वाहनातून
वन रुम, शाळेजवळ
आदिवासींचा घोळका सभोवार गलका करता झाला
लेतू, पोतू, कोमू, लकमी, पोती,समदुरी
सारे ................ सारेच
तेंव्हा पर्यटक विचारते झाले.
केंव्हापासून घर करुन राहता?
हे विणीचे वस्त्र केंव्हापासून?
तुमचा वंश कोणता?
धर्म?
कुलदेवता?
निदान राष्ट्र?
आँ ! त्यांनी आपापल्या तोंडात बोटे घातली
अन भुवया आकाश दिशेने उंचावल्या.
वंश? धर्म?
कुलदेवता?
राष्ट्र?
अरे ! हे .. हे... हे नद्यानद्याप समुद्र सूर्य चंद्र ....
हे सारं आमचं असल्यावरबी?
पर्यटकांना किळस आली
च्चॅ ....... च्चॅ ........ च्चॅ
निधर्मी असणं मोठा अधर्म होय
माणसाला स्वधर्म असावा !
पर्यटक पाठमोरे झाले तेव्हा
लेत्तू पोत्तू बोलते झाले
वारे मासूर !

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

- आजीव सभासद ६०० रूपये (फक्त व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**सचिव**

*महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद*

*६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७*

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80



Printed by : MONARCH PRINT ARTS, PUNE 30. TEL. : 24488542